cmyk

## संपादकीय

### स्थानिक स्वराज्य संस्था टांगणीला?

सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतीक्षेत महाराष्ट्रातील गाव, शहरांमध्ये लोकशाहीला टांगणी लावली गेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर न्यायालयाची तलवार टांगली गेली आहे आणि हजारो गावकऱ्यांच्या हक्कावर काळ्या सावल्या पसरल्या आहेत.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२१० | गुरूवार दि.२७ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### पाकचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची हत्या?

इस्लामाबादः पाकिस्तानच्या सरकारमध्ये तेथील लष्कराचा हस्तक्षेप आणि यातून समोर होणारा विध्वंस यामुळे पाकिस्तानात नेहमीच हिंसाचाराच्या अनेक घटना समोर येतात असे असतानाच आता संपूर्ण जगाला हादरवून सोडणारी माहिती समोर येत आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची तुरुंगातच हत्या झाल्याचा दावा केला जातो आहे. तशी अफवा वाऱ्यासारखी पसरली आहे. पाकिस्तानी सरकार आणि तुरुंग प्रशासनाने संगनमत करून इम्रान खान यांचा छळ करून त्यांची हत्या केल्याचा दावा केला जात आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान हे २०२३ सालापासून रावळपिंडी येथील अदियाला तुरुंगात कैद आहेत. सध्या मात्र त्यांची तुरुंगात हत्या केल्याची अफवा पसरली आहे.

### काँग्रेस जिल्हाध्यक्षांचे अपहरण, मारहाण

अहिल्यानगर : अहिल्यानगर काँग्रेस जिल्हाध्यक्षांचे अपहरण करून मारहाण करण्यात आली आहे. अपहरण करतानाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. श्रीरामपूरमध्ये जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांचे अपहरण करण्यात आले. त्यांना मारहाणही झाल्याची माहिती मिळाली आहे. या धक्कादायक घटनेनंतर अहिल्यानगर आणि श्रीरामपूरमधील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर ही घटना घडल्यामुळे राज्यात चर्चेला उधाण आले आहे. जिल्हाध्यक्ष सचिन गुजर हे नित्यनियमाप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी गेले होते. त्यावेळी त्यांचे अपहरण करण्यात आले.

### बीएलओंच्या मृत्यूप्रकरणी उत्तर द्या – न्यायालय

नवी दिल्लीः केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगांशी संबंधित विविध याचिकांवर बुधवारी सुप्रीम कोर्टात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. मतदार यादी पुनरीक्षण(एसआयआर), पश्चिम बंगालमधील बीएलओंचा मृत्यू, तसेच केरळ आणि तामिळनाडूतील प्रकरणांवर न्यायालयाने कठोर भूमिका घेतली. वरिष्ठ वकील कपिल सिब्बल आणि प्रशांत भूषण यांनी महत्त्वपूर्ण युक्तिवाद मांडला, तर निवडणूक आयोगाने सर्व आरोप राजकीय असल्याचा दावा केला. सुप्रीम कोर्टाने याप्रकरणी केंद्र आणि राज्य निवडणूक आयोगांना १ डिसेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

### मालेगाव पुन्हा हादरले बालिकेवर अत्याचार

मालेगावः मालेगावात पुन्हा एकदा १३ वर्षीय मतिमंद मुलीवर एका ५५ वर्षाच्या संशयित आरोपीकडून अत्याचार करण्यात आल्याची निंदनीय घटना घडल्याने मालेगाव पुन्हा एकदा हादरले आहे. पीडित बालिकेला दिपक धनराज छाजेड रा. मालेगांव जि नाशिक, वय वर्ष अंदाजे ५५, या संशयित आरोपीने फूस लावून त्याच्या स्कुटीवर बसवून एका पडीत जागेवर घेऊन जाऊन अत्याचार केले. या प्रकरणी पोलिस ठाण्यात अत्याचार व पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून या संशयित आरोपीला पोलिसांनी अटक करून बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले.

### आता 'सेन्यार चक्रीवादळ'चा धोका

नवी दिल्लीः पाऊस गेला असे वाटत असतानाच आता पुन्हा एकदा अनेक राज्यांना अवकाळी पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. हवामान विभागाकडून या पार्श्वभूमीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला असून ताशी १०० किमी वेगाने 'सेन्यार' नावाचे चक्रीवादळ देशावर चालून येत आहे. भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार मलेशियाच्या आसपास तीव्र कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून याचे हळुहळु चक्रीवादळात रुपांतर होत आहे, हे चक्रीवदाळ आता बंगालच्या उपसागराकडे सरकत असून पुढील एक ते दोन दिवस देशातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

# खरिपात कडधान्य तेलबिया उत्पादनात घट

## केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

**देशात २०२५–२६ च्या खरीप हंगामात तांदूळ उत्पादनाने नवीन उच्चांक गाठला आहे. परंतु कडधान्य आणि तेलबिया उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने बुधवारी (दि.२६) खरीप २०२५–२६ च्या खरीप हंगामाचा पहिला आगाऊ अंदाज जाहीर केला आहे. या अहवालानुसार खरीप पिकांच्या उत्पादनात विक्रमी वाढ केंद्र सरकारला अपेक्षित आहे. परंतु कडधान्य आणि तेलबिया उत्पादनात मात्र घटीचे अंदाज आहेत.**

देशात खरीप हंगामात २७.५६ दशलक्ष टन तेलबियांचे उत्पादन अंदाजित आहे. यामध्ये सोयाबीनचे उत्पादन १४.२६ दशलक्ष टन अंदाजित असून गेल्यावर्षी सोयाबीनचे उत्पादन १५.२६ दशलक्ष झाले होते. तर शेंगदाण्याच्या उत्पादनात वाढ होण्याचा अंदाज कृषी मंत्रालयाने व्यक्त केला आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने बुधवारी दिलेल्या माहितीनुसार, खरीप २०२५–२६ मध्ये देशात एकूण अन्नधान्याचे १७३.३ दशलक्ष टन इतके अंदाजित असून ते गेल्यावर्षीच्या १६९.५ दशलक्ष टनांपेक्षा अधिक आहे. तसेच खरीप हंगामात तांदळाचे १२४.५ दशलक्ष टन उत्पादन अंदाजित आहे. गेल्यावर्षी १२२.८ दशलक्ष टन उत्पादन झाले होते. म्हणजेच गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा १.४ टक्क्यांनी उत्पादनात वाढीची अपेक्षा आहे. याबद्दल केंद्रीय कृषिमंत्री चौहान म्हणाले, ''देशात काही भागात अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असले तरी बहुतेक राज्यात चांगल्या पावसामुळे पिकवाढ उत्कृष्ट झाली आहे.'' असे सांगितले. देशात पावसाळ्याच्या सुरुवातीला जून ते जुलै या कालावधीत ▶▶ पान २ वर



### कापूस घटणार तर ऊस उत्पादन वाढणार


कापसाचे उत्पादन गेल्यावर्षीच्या २९.७२ दशलक्ष गाठींवरून २९.२१ दशलक्ष होण्याचा अंदाज आहे. तर ऊस उत्पादन ४५४ दशलक्ष टनांवरून ४७५.६ दशलक्ष टनांपर्यंत वाढण्याचा अंदाज कृषी मंत्रालयाने दिला आहे. कृषी मंत्रालय पिक उत्पादनाचे वर्षभरातील चार आगाऊ अंदाज प्रसिद्ध करत असते. पिक कापणी प्रयोगांमधून मिळणाऱ्या प्रत्यक्ष माहितीच्या आधारे हे अंदाज पुढे सुधारले जातात.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह १८ जणांना बेड्या

## राज्यभरात रॅकेट असल्याचा संशय

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यात शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) प्रश्नपत्रिका फोडुन उमेदवारांना बनावट मार्गाने परीक्षा उत्तीर्ण होण्यास मदत करणाऱ्या रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. टीईटी २३ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. परीक्षेच्या आदल्या दिवशी काही व्यक्ती पैशासाठी प्रश्नपत्रिका फिरवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली आणि अनेक संशयितांना ताब्यात घेतले. आतापर्यंत, मुख्य आरोपी महेश गायकवाडसह १८ जणांना अटक करण्यात आली आहे.




प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी टीईटी ही अनिवार्य पात्रता परीक्षा आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखा आणि मुरगुड पोलिसांच्या ▶▶ पान २ वर

# अवैध वाळू रोखण्यासाठी सरकार आक्रमक

## वाहतूक करणाऱ्या वाहनांचा परवाना जागेवरच होणार रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील वाळू आणि इतर गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक रोखण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे पाऊल उचलले आहे. अवैध वाळूची वाहतूक करताना एखादे वाहन सापडल्यास त्याचा परवाना जागेवरच रद्द केला जाईल किंवा थेट निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार सरकारने हा निर्णय घेतला आहे. महसूल विभागाने यासंदर्भातील परिपत्रक जारी केले आहे.**

राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाळू आणि इतर गौण खनिजांच्या चोरीमुळे शासनाच्या महसूलाची आणि पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. सोबतच या अवैध व्यवसायातून गुन्हेगारी वाढत असून, कारवाईसाठी जाणाऱ्या शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार, अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी ▶▶ पान २ वर

### अशा पद्धतीने होणार कारवाई

पहिला गुन्हा : ३० दिवसांसाठी परवाना (परमिट) निलंबित करणे आणि वाहन ताब्यात घेणे.

दुसरा गुन्हा : ६० दिवसांसाठी परवाना निलंबित करणे आणि वाहन वाहन ताब्यात घेणे.

तिसरा गुन्हा : संबंधित वाहनाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करणे आणि प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत पुढील कारवाईसाठी वाहन जप्त करणे.

# योजनांचे श्रेय कुणी व्यक्तिगत घेऊ नये-मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

कुठल्याही योजनांचे श्रेय कुणी व्यक्तिगत घेऊ नये. सरकारच्या योजना या सरकारच्याच असतात कुठल्याही एका पक्षाच्या नाहीत. तिन्ही पक्षांच्या त्या योजना आहेत, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणाचेही नाव न घेता सहयोगी घटक पक्षांच्या नेत्यांना खडे बोल सुनावले. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात विविध योजना मार्गी लागल्या असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूर्व विदर्भातील दौऱ्यात काल आवर्जून सांगितले. या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विधानाला महत्त्व आले आहे. नागपूर जिल्ह्यातील नगरपरिषद नगरपंचायत निवडणुकीच्या ▶▶ पान २ वर

# मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा कट–राज ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

आयआयटी बॉम्बेचे नाव बदलून आयआयटी मुंबई न करण्याबाबत केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी केलेली टिप्पणी सरकारची मानसिकता दर्शवत असल्याचे मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी म्हटले आहे. सिंह यांचे विधान स्पष्टपणे सरकारच्या मानसिकतेचे प्रतीक



असल्याचे दिसून येते. नेहमीच मराठी लोकांची असलेली मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा कट मराठी नेत्यांनी आणि जनतेने हाणून पाडला असल्याचे राज ठाकरे यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

आमची मराठी मुंबई महाराष्ट्रातच राहिली. आता, त्यांच्या पोटात दशकांपासून असलेली कटुता पुन्हा एकदा बाहेर पडू लागली आहे. मुंबईतील लोकांनी आणि संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात राहणाऱ्या सर्व मराठी लोकांनी आता डोळे उघडले पाहिजेत. मुंबई हे नाव त्यांना (सत्ताधारी प्रशासनाला) त्रास देते कारण मुंबई हे मूळ देवी मुंबादेवीच्या नावावरून ठेवले आहे. ▶▶ पान २ वर

# विकसित भारतासाठी कर्तव्याला प्राधान्य द्या

## संविधान दिनानिमित्त पीएम मोदींचे खास पत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधान दिनाचे औचित्य साधत देशातील नागरिकांना एक भावनिक पत्र लिहून आपले कर्तव्य हेच सर्वोच्च मानण्याचे आवाहन केले आहे. येत्या २०४७ पर्यंत विकसित भारत हे ध्येय साधण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचा संकल्प करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली आहे.**



संविधानाचा स्वीकार होऊन ७६ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जारी केलेल्या या पत्रात, पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या लोकशाही भविष्यासाठी नागरिकांची जबाबदारी, विशेषत: मतदान करणे आणि तरुणांचा सक्रिय सहभाग, यावर विशेष भर दिला आहे. देशाच्या प्रगतीसाठी कर्तव्ये पूर्ण करणे किती ▶▶ पान २ वर

# दरवर्षी १ लाखांहून अधिक अग्निवीर भरले जाणार!

## भारतीय सैन्यात एक लाखांहून अधिक सैनिकांची कमतरता



**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारतीय सैन्य दलात सध्या सुमारे १.८ लाख सैनिकांची मोठी कमतरता आहे. ही कमतरता तातडीने भरून काढण्यासाठी केंद्र सरकार अग्निवीरांची भरती वाढवण्याच्या तयारीत आहे. सध्या अग्निवीरांसाठी वार्षिक ४५,००० ते ५०,००० इतकी असलेली रिक्त पदांची संख्या वाढवून ती दरवर्षी १ लाखांहून अधिक करण्याचा विचार उच्च स्तरावर सुरू आहे.

अतिरिक्त रिक्त पदे जाहीर करताना, ▶▶ पान २ वर

# जेवणात आढळली पाल २८ विद्यार्थ्यांना विषबाधा



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगरमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणात शिजलेली पाल आढळल्याने खळबळ उडाली आहे. रात्रीच्या जेवणात एका विद्यार्थ्याच्या ताटात पाल सापडल्यानंतर हे जेवण खाल्लेल्या अनेक विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. सुमारे १० ते १५ विद्यार्थ्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.**

छत्रपती संभाजीनगरमधील किल्लेआर्क इथल्या समाज कल्याण वसतिगृहाच्या जेवणात गवारीच्या भाजीत पाल आढळली. यामुळे काही विद्यार्थ्यांना मळमळ आणि उलट्या झाल्या. त्यांना तात्काळ घाटी रुग्णालयात दाखल करावे लागले. संतप्त विद्यार्थ्यांनी रात्री ११.३० वाजेपर्यंत वसतिगृहासमोर धरणे आंदोलन केले. छत्रपती संभाजीनगर शहरातील समाज कल्याण विभागाच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ४५.५० क्विंटल | २,३०० | २,९७१ | २,६५५ |
| ज्वारी/हायब्रिड: २१.०० क्विंटल | २,७०० | ३,७२० | ३,१२९ |
| मका/लोकलः ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १९.०० क्विंटल | ३,००० | ५,३५१ | ४,५९२ |
| बाजरीः १३.०० क्विंटल | २,६१० | २,९४५ | २,८१४ |
| मुगः २.०० क्विंटल | ५,१०१ | ५,१०१ | ५,१०१ |
| सोयाबीनः ६५.०० क्विंटल | ४,४५० | ४,५८० | ४,५१५ |
| हरभराः १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# विद्यार्थ्या अभावी राज्यातील ६०० मराठी शाळांवर गंडांतर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील सरकारी, अनुदानित अशा २० आणि त्याहून कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने येत्या काळात विविध जिल्ह्यांमध्ये तब्बल ६०० हून अधिक शाळांना टाळे लागण्याची शक्यता आहे. यातून मोठ्या प्रमाणात अतिरिक्त शिक्षकांची संख्या वाढल्यास राज्यात सध्या सुरू असलेली शिक्षक भरतीची प्रक्रियाही रखडण्याची भीती शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.



कमी पटसंख्या असलेल्या शाळांची सर्वाधिक संख्या ही ग्रामीण, दुर्गम भागातील आहे. यामुळे या भागातील शाळांसाठी सरकारने पटसंख्येच्या निकषांमध्ये तत्काळ बदल करावा, अशी मागणी केली जात आहे. या बदलासाठी सरकारने संचमान्यतेसाठी १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयात बदल करावा, अशी मागणी राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने, राज्य शिक्षण क्रांतीचे अध्यक्ष सुधीर घागस यांच्यासह विविध शिक्षक संघटनांकडून करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील शिक्षकांचे ५ डिसेंबरपर्यंत समायोजन झाले तर दहावीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचे काय करायचे, हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्यात २०२४–२५ चा सेवकसंच झालेला आहे. या सेवकसंचानुसार राज्यातील जवळपास ६०० शाळांमध्ये ▶▶ पान २ वर

### अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न

सध्या राज्यात अनेक अनुदानित तसेच विनाअनुदानित शाळा सक्रिय आहेत. याच शाळांबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. संचमान्यतेची प्रक्रिया फायद्याची ठरताना दिसत असली तरी काहींसाठी अडचणीची ठरताना दिसत आहे. त्यामुळे आता राज्यातील ६०० शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे समोर आले आहे.त्यामुळे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत त्यातच नव्याने शिक्षक भरती देखील रखडणार असल्याचे दिसते.

cmyk

## अग्रलेख

# स्थानिक स्वराज्य संस्था टांगणीला?

सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतीक्षेत महाराष्ट्रातील गाव, शहरांमध्ये लोकशाहीला टांगणी लावली गेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर न्यायालयाची तलवार टांगली गेली आहे आणि हजारो गावकऱ्यांच्या हक्कावर काळ्या सावल्या पसरल्या आहेत. कोविडनंतर तीन वर्षे स्थगित झालेल्या निवडणुकांमध्ये आता निवडणूक आयोगाची माशी आणि सर्वोच्च न्यायालयाची प्रतीक्षा हीच खरी ''राजकीय टांगणी'' बनली आहे.

२०२५ च्या सुरुवातीला न्यायालयाने स्पष्ट सांगितले होते की, रखडलेल्या संस्थांमध्ये चार महिन्यांच्या आत निवडणुका घेऊन आरक्षणाचे नियम काटेकोर पाळावेत. मात्र, राजकारणाने नियमांमध्ये नाक खुपसले आहे. अनेक जिल्हा परिषदांनी ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण लागू केले, ज्यामुळे याचिका न्यायालयात पोहोचल्या. न्यायालयाने स्पष्ट सांगितले: ''मर्यादा ओलांडू नका; अन्यथा निवडणुका स्थगित होतील.'' राजकारणी वर्गासाठी हे सुवर्णसंधीच ठरले आहे. अधिक आरक्षण म्हणजे अधिक मतांचा खेळ आणि सत्ता टिकवण्याचे साधन. पण संविधानावर राजकारण भारी पडू शकत नाही. शिफारस म्हणजे आदेश नाही; राज्याने नियम पाळणे बंधनकारक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींची जागा सुरक्षित राहणार की प्रशासकीय अधिनियमनाने चालणार, हे पूर्णपणे न्यायालयाच्या पुढील निर्णयावर अवलंबून आहे. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या सुनावणीत पुढील तारखेची वेळ मागितली गेली. पुढील सुनावणी २८ नोव्हेंबर रोजी ठरली आहे. त्या निर्णयानंतरच निवडणुकीचा मार्ग मोकळा होईल. पाणी, आरोग्य, सार्वजनिक सुविधा प्रशासकांच्या देखरेखीखाली सुरू आहेत. मात्र, लोकशाहीचा जीव थांबलेला आहे. गावकऱ्यांच्या शाळा, आरोग्य केंद्र, रस्ते असे सर्व काही प्रशासनाच्या आदेशावर चालले जात आहे. लोकांचा आवाज क्षीण पावत चालला आहे आणि स्वराज्याची आत्मा दमली आहे.

लोकप्रतिनिधित्व आणि आरक्षणाचे संतुलन संवैधानिक चौकटीत राहणे आवश्यक आहे. मर्यादेबाहेर जाणे म्हणजे समाजाच्या काही वर्गांवर अन्याय करणे. न्यायालय हस्तक्षेप करते ते फक्त तडजोडीशिवाय न्याय राखण्यासाठी. राजकारणी, प्रशासन आणि पक्ष यांचे समीकरण आता या चौकटीत अडकले आहे. लोकशाहीला धोका, स्वराज्याला फटका, प्रशासनाला गोंधळ हेच महाराष्ट्राच्या गावशहरांमध्ये सध्या सुरू आहे. निवडणुका स्थगित झाल्या, तर लोकप्रतिनिधी नसल्यामुळे विकास आणि जनकल्याणाच्या कामावर प्रश्नचिन्ह उभे राहील. लोकशाही ही फक्त मतदान नाही; ती आहे आवाज, हक्क आणि सत्ता आणि ही सत्ता नागरिकांपासून लंपास होत आहे. राजकारणी वर्गाने हे स्वराज्य राजकीय खेळासाठी वापरले, पण आता न्यायालयाच्या चौकटीत अडकले आहे. निवडणुका विलंबित राहिल्या, तर लोकांचा विश्वास कायमचा धोक्यात येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकशक्तीचा प्रवाह पुन्हा सुरळीत होणे अत्यावश्यक आहे; अन्यथा महाराष्ट्राच्या स्वराज्याची तलवार कायम टांगलेली राहील. न्यायालयाने त्वरित निर्णय घेऊन आरक्षणाचे संतुलन राखणे आणि लोकप्रतिनिधींचे हक्क पुनर्स्थापित करणे हे गरजेचे आहे. अन्यथा, स्वराज्य हा शब्द फक्त कागदी, औपचारिक आणि मरणासन्न अर्थाने शिल्लक राहील. महाराष्ट्रातील लोकशाहीचा चढाओढीचा खेळ आता न्यायालयाच्या डावखोर हातात आहे. लोकांचा आवाज तुटणार की कायम टिकणार? हे आता सर्वोच्च न्यायालयावर अवलंबून आहे.

## देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत विवाह सोहळा;यात्रेत कुस्त्यांची दंगल !

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत खंडेरायाची मोठी यात्रा भरते. याच पार्श्वभूमीवर बुधवारी पहाटे सुर्योदयापूर्वी खंडेरायाच्या लग्नाचा पारंपारिक सोहळा पार पडला. देवाच्या विवाह सोहळ्यास हजारो भाविक भक्तांनी उपस्थिती लावली. यात्रेत गुरुवारी कुस्त्यांची जंगी दंगल रंगणार असून पहिलवान व कुस्ती शौकीन मंडळींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन यात्रा उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.**

चंपाषष्ठी निमित्त सबंध महाराष्ट्रात ठिकठिकाणी खंडोबाची यात्रा भरते. देव दहिफळ येथे तब्बल दोन महिने ही यात्रा चालते. नागदिवे पूजन दिवशी दिंद्रुड व कानसुर येथील मानाची खंडोबा काटी तसेच,साळेगाव,पुसद आणि बाबळगाव येथील पालखी,नाकलगांव चे काकण देवदहिफळ येथे दाखल झाल्या. रात्री शोभेची दारू उडवण्यात आली. दि.२६ बुधवारी चंपाषष्ठीच्या पहाटे सुर्यदयापूर्वी खंडोबा देवाचे म्हाळसा देवी सोबत लग्न लावण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. तत्पूर्वी महापूजा सौ.पुजा व किर्तीकुमार जगताप यांच्या हस्ते संपन्न झाली.हजारो भाविक भक्तांनी देवाच्या लग्नास उपस्थित राहून दर्शन घेतले. यात्रेनिमित्त गुरुवारी कुस्त्यांची जंगी दंगलीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती श्री खंडोबा देवस्थान कमिटी कडून देण्यात आली. कुस्तीच्या दंगलीतील कुस्ती स्पर्धे मध्ये १० रुपया पासुन ते ५१०१ रुपयांची बक्षीस दिली जाणार आहेत. बीड जिल्हा व मराठवाड्यातील कुस्ती प्रेमींना कुस्तीच्या दंगलीस उपस्थित राहण्याचे आवाहन देवदहिफळचे सरपंच श्रीधर बडे यांनी केले आहे. सरपंच श्रीधर बडे,माजी जि.प.सदस्य विलासराव बडे, श्रीहरी बडे, शिवाजीराव बडे, दिलीप बडे, विकास बडे,राज बडे, सुग्रीव बडे, रमेश बडे, दामोधर बडे, मुरलीधर बडे, नवनाथ बडे, विष्णुपंत बडे, राजेभाऊ बडे, गोपाळराव बडे, बबन कांदे, अंगद वड्डे, शेख तायेर, सुभाष कांबळे,राम आंधळे,बाळकिसन आंधळे, विष्णू राख,नय्युम शेख,बाळू तोंडे, अंगद बडे, खंडू सहजराव, दामूआन्ना बडे, रामराव बडे, बाबासाहेब बडे, बाबुराव बडे,नामदेव जाधव,राधाकिसन बडे, उत्तम कांदे,वसंत तोंडे,पुजारी किर्तीकुमार जगताप यांच्या सह गावकऱ्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## लक्ष्मण पवारांना मागिल दोनवेळेस माझ्यामुळेच गुलाल लागला-दाभाडे

**गेवराई । प्रतिनिधी**

**लक्ष्मण पवार २०११ ला पहिल्यांदाच आमदारकी ला उभे राहिले त्यावेळेस मी त्यांच्या सोबत होतो दुसऱ्यांना २०१९ ला उभे राहिले तेंव्हा पण मी होतो. परंतु २०२४ ला मी तटस्थ राहिलो आणी लक्ष्मण पवार यांचे डिपॉझिट गुल झाले. हे पवारांनी विसरू नये. असे माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे राष्ट्रवादीत कॉग्रस पार्टीच्या निवडणुक जाहिरनाम्याचे प्रकाश करते वेळी बोलतांना मनाले.**

आम्ही विरोधकांसाठी जीवाचे रान केले आणि ते म्हणतात आम्ही त्यांना सोडून गेलो. आम्ही का सोडून गेलो याचा त्यांनी विचार करावा व तुम्ही अगोदर कोणाचे होता हे पहा. आमचे मामा त्यांच्यासोबत होते उगीच घरात भांडण नको म्हणून आम्ही त्यांच्यासोबत होतो. जे माझ्यासोबत जीवाचे मित्र आहेत ते तुम्ही माजी आ. लक्ष्मण पवार यांना विचारा तुमचे जीवाचे मित्र त्यांना तुम्ही काय दिले. आज माझ्या जीवाचे जे मित्र आहेत त्यांच्यासाठी मी जीव देऊ शकतो व तेही माझ्यासाठी जीव देऊ शकतात. आम्ही हेच कमावलं दोन वेळेस मी तुमच्यासोबत होतो म्हणून तुम्हाला गुलाल लागला परंतु तिसऱ्या वेळेस मी तटस्थ राहिल्याने तुम्ही ८० हजार मताने पडला तुमचे डिपॉझिट पण गुल झालं असे माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या निवडणूक जाहीरनामा प्रकाशन सोहळ्यात बोलताना म्हणाले.

## तर गौरीचा जीव वाचला असता पालकाचा आक्रोश

### ना.पंकजा मुंडे यांनी न्याय भूमिका घेण्याचा दिला शब्द



**बीड । प्रतिनिधी**

**पंकजाताई साहेब, तुम्हाला मी अगोदरच सांगितले असते तर माझ्या मुलीचा जीव वाचला असता की हो.. असा आक्रोश डॉ गौरी पालवेच्या आई-वडिलांनी आज ना. पंकजाताई मुंडे यांच्यासमोर केला. याप्रकरणात न्याय भूमिका घेऊ असा शब्द ना. पंकजाताईंनी यांनी पालवे परिवाराला दिला.**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज संध्याकाळी पिंपळनेर येथे जाऊन डॉ गौरी पालवेंच्या आई-वडिलांची भेट घेतली व सांत्वन करत त्यांना धीर दिला. पंकजाताईंना पाहताच गौरीच्या आई-वडिलांना अश्रू अनावर झाले. ताईसाहेब, तुम्हाला अगोदरच सांगितले असते तर माझ्या मुलीचा जीव वाचला असता असा आक्रोश त्यांनी केला. गौरीचा जीव गेला, याचे मला दुःख आहे, मी या घटनेने व्यथित झाले आहे. यात माझी भूमिका न्याय्य अशीच राहील. मी मुख्यमंत्र्याना देखील बोलले आहे, तपास योग्यच होईल अशा शब्दांत त्यांनी पालवे कुटुंबाला धीर दिला.

# एक हाती सत्ता भाजपाकडे द्या बीडच्या विकासाला प्राधान्य देऊ-ना.पंकजा मुंडे



**बीड । प्रतिनिधी**

**जयदत्त क्षीरसागर हे बीडचे आमदार असताना आम्ही एकत्रितपणे विकासाची अनेक कामे केली आहेत. बीडच्या अधिकाधिक विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः झुकते माप देतील. त्यासाठी मी स्वतः ठामपणे आग्रह धरणार आहे. त्यामुळे बीडची नगरपरिषद एकहाती भाजपच्या ताब्यात द्या, असे आवाहन भाजप नेत्या, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.**

भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती रविंद्र घुंबरे यांच्यासह नगरसेवकपदाच्या प्रभाग क्र. १३ च्या उमेदवार समिक्षा प्रशांत शेटे, सय्यद मुस्तफा तसेच प्रभाग क्र. १४ चे उमेदवार गणेश लक्ष्मणराव वाघमारे, सौ. मनिषा सुधीर सुरवसे यांच्यासह इतरही उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि. २६) सायंकाळी जाहीर सभा पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे, जिल्हा सरचिटणीस ॲड. सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा, डॉ. आदित्य सारडा, चंद्रकांत फड, देविदास नागरगोजे, संतोष राख, रविंद्र कदम, भाजपचे तालुकाध्यक्ष मनोज पाटील, सुंदर चव्हाण, बालाजी पवार, संभाजी सुर्वे, नूर लाला, डॉ. अभय वनवे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, डॉ. योगेश व डॉ. सारिका हे व्यथित मनःस्थितीत माझ्याकडे आले होते. त्यांना मी भाजपमध्ये सामावून घेतले. बीडमध्ये भाजपच्या चिन्हावर आम्ही पहिल्यांदाच संपूर्ण ताकदीने निवडणूक लढवत आहोत. आता डॉ. क्षीरसागर दांपत्याच्या माध्यमातून बीडमध्ये नक्कीच कमळ फुलेल. अनेकांचे चष्मे वेगवेगळ्या रंगांचे असू शकतात; मात्र आमच्या लेन्समध्ये भगवा, हिरवा, निळा, पिवळा हे सर्वच रंग समान आहेत. सर्व समाज, सर्व घटक आम्हाला समान आहेत. भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे या भूलतज्ज्ञ आहेत. त्या निवडून आल्यास राजकारणातील वाईट प्रवृत्तींना 'भूल' देऊन बाजूला सारण्याचे काम त्या करतील. जिल्ह्यातील भाजपचे सर्व उमेदवार उच्चशिक्षित, सोज्वळ आणि सुसंस्कृत आहेत. बीडच्या बिंदुसरा नदीचे सुशोभीकरण करू. त्या नदीचे रूपडे बदलण्याची जबाबदारी मी स्वतः घेत आहे. रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गासाठी अतिरिक्त निधी देण्याची मागणी निश्चितच पूर्ण केली जाईल. प्रास्ताविक प्रभाग क्र. १४ मधील उमेदवार गणेश वाघमारे यांनी केले. भाजपचे युवा नेते संभाजी सुर्वे यांनी आभार मानले. यावेळी लाडक्या बहिणीसह पुरुषांची ही मोठ्या संख्येने गर्दी होती.

### पंकजाताईंमुळे रेल्वे आली, पालवण चौक भागाचा कायापालट करू-डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले की, बीडला रेल्वे आणण्याचे स्वप्न स्व. केशरकाकू आणि स्व. गोपीनाथ मुंडे यांचे होते. ते पंकजाताईंमुळे पूर्ण झाले आहे. आता बीडमधील पालवण चौक भागाजवळ रेल्वे आली आहे. या भागाचा कायापालट होणार आहे. अधिकाधिक विकासासाठी भाजपच्या डॉ. ज्योती घुंबरे यांच्यासह सर्व नगरसेवकपदाच्या उमेदवारांना निवडून द्यावे, असे आवाहन डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केले.

### बीड शांत ठेवण्यासाठी भाजपला मतदान करा-नवनाथ शिराळे

बीडमध्ये विरोधक जात-धर्माचा मुद्दा काढून मते मागत आहेत. सासूसाठी जावई मतदान मागत आहे. यांच्यामुळे बीड अशांत होण्याची चिन्हे दिसत आहेत . हे आपल्याला रोखावे लागणार आहे. नेहमीप्रमाणे बीड शांत ठेवण्यासाठी भाजपला मतदान करावे, असे आवाहन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे यांनी केले.

### लाडक्या बहिणींमुळे भाजप जिंकणार-ॲड. सर्जेराव तांदळे

गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपने सत्ता मिळवून विकास केला आहे. पंकजाताईंच्या माध्यमातून आणखी विकास करायचा आहे. त्यासाठी बीड नगरपरिषद भाजपच्या ताब्यात द्यावी लागेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंकजाताई मुंडे यांच्यामुळे 'लाडकी बहीण' योजना सुरू आहे. या योजनेचा मोठा लाभ मिळत असून पुन्हा एकदा बीडमध्ये लाडक्या बहिणींमुळे भाजप जिंकणार आहे, असा विश्वास ॲड. सर्जेराव तांदळे यांनी व्यक्त केला.

## मालेगाव घटनेच्या निषेधार्थ सोनपेठ येथे कडकडीत बंद, तहसील कार्यालयावर मोर्चा

**परभणी । प्रतिनिधी**

**नाशिक जिल्ह्यातील मालेगाव डोंगराळे येथील तीन वर्षाच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचार व निर्घृण हत्येप्रकरणी सर्व शाखीय सुवर्णकार व सराफा असोसिएशने सोनपेठ शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदमध्ये सकाळपासूनच शहरातील अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने दिवसभर बंद ठेवून घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.**

ग्रामदैवत हनुमान मंदिर येथून विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मोर्चात शहरातील सर्व जाती धर्माचे नागरिक, खाजगी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थींनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तहसीलदार सुनील कावरखे यांना शाळेतील विद्यार्थी यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात जलदगती न्यायालयात प्रकरण चालवून आरोपीला लवकरात लवकर मरेपर्यंत फाशीची शिक्षा व्हावी. यासाठी सरकारी वकील ॲड.उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी. पोलिस अथवा प्रशासनातील कोणताही निष्काळजीपणा आढळून आल्यास संबंधितांवर कडक कार्यवाही करावी.



तसेच सोनपेठ तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना संरक्षण म्हणून चिडीमार पथक नेमण्यात यावे, आदी सह मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या घटनेचा निषेध व्यक्त करत ही बाब गांभीर्यपूर्वक घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, असे दिलेल्या निवेदनात नमुद आहे. शेवटी या घटनेचा निषेध व्यक्त करून सोनपेठकरांच्या वतीने चिमुकलीला श्रद्धांजली वाहून मोर्चाची सांगता करण्यात आली. या मोर्चात शहरातील व्हिजन पब्लिक स्कूल व जिजामाता पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**स्व.डॉ. गौरी गर्जे (पालवे) यांचे वडील डॉ. अशोक पालवे व त्यांच्या कुटबियांची दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी पिंपळनेर ता. शिरूर (का.) येथे जाऊन सांत्वन पर भेट घेतली. यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ जयंत राख, सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. माधव सानप, पत्रकार नारायण नागरे, शिरूर (का.) पंचायत समितीचे माजी सभापती बाबुराव केदार**



## पान १ वरून...

### खरीपात कडधान्य,

खरीप पिकांची पेरणी केली जाते. तर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये कापणी केली जाते. देशात काही कडधान्य आणि तेलबियांसह भात हे मुख्य खरीप पीक आहे. देशात २०२५-२६ च्या खरीप हंगामात २८.३ दशलक्ष टन मक्याचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. मागील वर्षी २४.८ दशलक्ष उत्पादनाचा अंदाज होता. तसेच भरडधान्यांचे उत्पादन ४१.४ दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे. तर कडधान्यांचे उत्पादन गेल्यावर्षीच्या ७.७ दशलक्ष टनांच्या तुलनेत ७.४ दशलक्ष टन इतके कमी होण्याचा अंदाज आहे. तूर उत्पादन ३.५९ दशलक्ष टन होण्याचा अंदाज असून गेल्यावर्षीच्या ३.६२ दशलक्ष टनांपेक्षा किंचित कमी आहे. तर उडदाचे उत्पादन १.३४ दशलक्ष टनांच्या तुलनेत १.२ दशलक्ष टन कमी होण्याचा अंदाज आहे.

---------------

### अवैध वाळू रोखण्यासाठी

परिवहन विभागाच्या मदतीने आता कडक धोरण अवलंबण्यात आले आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या नवीन निर्देशानुसार, अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ अंतर्गत खालीलप्रमाणे कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

-------------

### विकसित भारतासाठी

महत्त्वाचे आहे, हे पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले. आपले प्रत्येक कार्य हे संविधानाला बळकट करणारे आणि राष्ट्रीय उद्दिष्ट्ये व हितसंबंधांना पुढे नेणारे असावे, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे. त्यांनी नागरिकांना राष्ट्रनिर्मितीबद्दल कृतज्ञता बाळगण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, जेव्हा आपण या भावनेने जगतो, तेव्हा कर्तव्ये पूर्ण करणे हा आपल्या स्वभावाचा अविभाज्य भाग बनतो. संविधानाच्या याच शक्ती आणि पावित्र्यामुळे आपल्यासारख्या कोट्यवधी लोकांना सक्षम बनवले, असेही त्यांनी सांगितले. माझ्यासारख्या एका गरीब आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातून आलेल्या व्यक्तीला सरकारचे प्रमुख म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली, ही आपल्या संविधानाचीच ताकद आहे, असे त्यांनी नमूद केले. २०१४ मध्ये संसदेच्या पायऱ्यांवर नतमस्तक होणे आणि २०१९ मध्ये संविधानाला कपाळावर लावणे, हे क्षण लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या आपल्या बांधिलकीचे प्रतीक आहेत, असे ते म्हणाले.

------------

### मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी

पिढ्यानपिढ्या येथे राहणारे मराठी लोक आहेत. केंद्र सरकारने पंजाबच्या नियंत्रणातून चंदीगड हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला, परंतु इतर सर्व पक्षांच्या विरोधाला तोंड दिल्यानंतर ते मागे हटले. मुंबईच्या बाबतीतही असेच काहीतरी सुरू आहे. शांतपणे शहराचा ताबा घेण्याचा प्रयत्न निश्चितच सुरू आहे. प्रथम मुंबई आणि नंतर संपूर्ण प्रदेश ताब्यात घेतला जाईल आणि गुजरातशी जोडला जाईल. मराठी लोकांनी जागे व्हावे, असे ठाकरे म्हणाले. मंत्री जितेंद्र सिंह यांनी केलेल्या एका वक्तव्यावरून वादळ उठले आहे. ते म्हणाले होते, आयआयटी बॉम्बेबद्दल सांगायचे झाले तर, देवाचे आभार, ते अजूनही हेच नाव आहे. तुम्ही ते बदलून मुंबई केलेले नाही. म्हणून ते तुमच्यासाठी आणखी एक कौतुकास्पद आहे. आणि मद्राससाठीही खरे आहे. ते आयआयटी मद्रासच राहिले असल्याचे सोमवारी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे येथे एका कार्यक्रमात बोलताना मंत्र्यांनी म्हटले होते. केंद्रीय राज्यमंत्र्यांनी केलेल्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातील राजकारण चांगलेच तापले आणि बॉम्बे विरुद्ध मुंबई हा वाद वाढला आहे. मनसेकडून रात्री मुंबई आयआयटीच्या गेटसमोर आयआयटी बॉम्बे नाही आयआयटी मुंबई असे बॅनर लावण्यात आले. यावर भाजपच्या नेत्यांनी सुद्धा राज ठाकरेंना प्रत्युत्तर दिले.

-------------

### योजनांचे श्रेय कुणी व्यक्तिगत

प्रचारासाठी आले असता ते माध्यमांशी उमरेड येथे जाहीर सभेनंतर बोलत होते.

-------------------

### दरवर्षी १ लाखांहून अधिक अग्निवीर

सर्व रेजिमेंटल प्रशिक्षण केंद्रांच्या सद्यस्थितीतील पायाभूत सुविधांचा आणि क्षमतेचा विचार केला जाईल. प्रशिक्षण आणि शारीरिक मानकांमध्ये कोणतीही तडजोड होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असे सूत्रांनी स्पष्ट केले आहे. या वर्षापासून अग्निवीरांसाठी अतिरिक्त रिक्त जागा भरण्याचा विचार लष्कर करत आहे, ज्याची संख्या दरवर्षी अंदाजे १ लाख इतकी आहे, कारण सैनिक निवृत्त होण्याबरोबरच डिसेंबर २०२६ नंतर अग्निवीरांची संख्या टप्प्याटप्प्याने कमी होण्याची शक्यता आहे. योजनेनुसार, पुढील चार वर्षांत सैन्यातील अग्निवीरांची संख्या १.७५ लाख आणि नौदल व हवाई दलातील संख्या २८,७०० पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा होती. मात्र, २०२२ मध्ये मर्यादित संख्येत भरती सुरू होऊनही, दरवर्षी सेवानिवृत्त होणाऱ्या साठ ते पासष्ट हजार सैनिकांच्या तुलनेत भरतीची संख्या खूपच कमी राहिली. या तफावतीमुळेच दरवर्षी सैनिकांच्या एकूण संख्येत २० हजार ते २५ हजार ने घट होत राहिली. परिणामी, आज सैन्यात एकूण १.८ लाख सैनिकांची कमतरता निर्माण झाली आहे.

----------

### जेवणात आढळली पाल

किल्लेआर्क येथील १००० मुलांच्या वसतिगृह युनिट क्रमांक १ च्या भोजनात काल सायंकाळी पाल आढळली. त्यानंतर काही विद्यार्थ्यांना मळमळ आणि उलट्या होऊ लागल्या. त्यांना घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोमवारी सायंकाळी साडेसातला जेवण करताना गवारीच्या शेंगांच्या भाजीमध्ये पाल आढळली. मुलांनी एकच आरडाओरडा केला. काहीजणांना मळमळ आणि उलटीचा त्रास होऊ लागल्याने मेस चालकाने घाटीत दाखल केले.

----------

### विद्यार्थ्या अभावी राज्यातील ६००

एकही शिक्षक मंजूर झालेला नाही, तर तितक्याच शाळांमध्ये अद्यापही शिक्षक कमी झालेले आहेत. यातच १५ मार्च २०२४ च्या सेवकसंच शासन निर्णयात दुरुस्ती करण्यात यावी, यासाठी अनेक शाळा व संघटनांनी न्यायालयात याचिकाही दाखल केलेल्या होत्या. मात्र, न्यायालयाने या याचिका फेटाळल्याने राज्य शिक्षण संचालकांनी राज्यातील सर्व शाळांना ५ डिसेंबर २०२५ पर्यंत शिक्षक समायोजन प्रक्रिया राबवावी, असे आदेश दिले आहेत.

----------

### टीईटी पेपरफुटी प्रकरणातील

संयुक्त पथकाने २३ नोव्हेंबर रोजी पहाटे कागल तालुक्यातील सोंगे गावातील एका फर्निचर दुकानावर छापा टाकला. छाप्यादरम्यान, त्या दिवशी उशिरा टीईटीला हजर राहणारे पाच उमेदवार घटनास्थळी आढळले. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की राहुल पाटील हा एक उमेदवार लीक झालेली प्रश्नपत्रिका घेऊन येणार होता. पाटील आणि इतर दोघांना नंतर ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या चौकशीदरम्यान, पाटील यांनी कथितपणे कबूल केले की गायकवाडने त्यांना टीईटीचा पेपर देण्याचे आश्वासन दिले होते. तो उमेदवारांना ३ लाख रुपयांना देणार होता. गायकवाडला नंतर सातारा जिल्ह्यातील कराड येथून अटक करण्यात आली. आतापर्यंत, आम्ही या प्रकरणात १८ जणांना अटक केली आहे आणि चौकशी पुढे सरकत असताना ही संख्या वाढू शकते. लीकमध्ये सूत्रधार आणि लाभार्थींसह आणखी काही व्यक्तींचा सहभाग तपासला जात आहे. आम्ही घोटाळ्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांची देखील पडताळणी करत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०२५



## थोडक्यात

### विनय तोतलाचे सीए परीक्षेत यश

बीड । प्रतिनिधी



जवाहरलाल सारडा यांचा नातू चिरंजीव विनय तोतला हा मेरिटमध्ये चार्टर्ड अकाउंटंट या मध्ये पास झाला त्याने खूप मेहनतीने ही पदवी मिळवली आहे तो २२ व्या वर्षीच चार्ट अकाउंट झालेला आहे त्याने आत्तापर्यंत ज्या काही परीक्षा होत्या सीए होण्यासाठी त्या फर्स्ट मध्येच पास झालेला आहे लहानपणापासूनच तो अभ्यासात हुशार होता म्हणून त्याने डिग्री पण सहजगत्या पास मिळवली आहे तो मनोजची तोपला यांचा मुलगा आहे त्यांचा एसटी पार्सल चा व्यवसाय आहे तसेच त्याची आई शो शीतल झोपला ही पण एम कॉम झालेली आहे त्या त्याने पुढे याच्या पुढचं शिक्षण घेण्याचे ठरवलेलं आहे



### शालेय साहित्य वाटप करून भारतीय संविधान दिन साजरा

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे यांनी भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने माळेगाव हायस्कुल मधील विद्यार्थ्यांना खाऊ व शालेय साहित्य वाटप केले.

गेल्या काही वर्षापासुन सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे हे महापुरुषांच्या विचारांना अनुसरून अशी प्रत्येक महापुरुषांची जयंती साजरी करतात यावेळी सुद्धा त्यांनी तीच सामाजिक बांधिलकी जोपासत समता,बंधुता,सामाजिक न्यायाची व सर्व भारतीयांना माणुस म्हणुन जगण्याचे अधिकार देणाऱ्या संविधान दिनानिमित्त त्यांनी सुकळी येथील शिवारात असणाऱ्या माळेगाव हायस्कुल माळेगाव मधील गुणवंत विद्यार्थी कदम गीतांजली,नियती टिळक,अक्षरा चाळक,भारती धनश्री,बोबडे श्रावणी,समृद्धी गिरी,कदम संघर्ष,गायकवाड गीता,बोबडे आरती,जावळे हरीश या विद्यार्थ्यांचा स्मृती चिन्ह देऊ सत्कार करण्यात आला इतर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून भारतीय संविधान दिन साजरा केला.यावेळी मुख्यध्यापक एस.एम लोकरे,शिक्षक कर्मचारी ए.एस जाधव,एस.आर सारूक,एस.बी गुजर,एम.एम लामतुरे,एम.एस फुंदे,जी.जे कदम,डि.वाय नागरगोजे,बी.बी भोसले,ए.डी इतापे व विद्यार्थी उपस्थित होते.



**आष्टी : आष्टी येथील महेश इन्स्टिटट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेकनॉलॉजी महाविद्यालयातील विद्यार्थिनी वैष्णवी राजाभाऊ ढोबळे हिने महाराष्ट्र संघाकडून शूटिंग बॉल राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून प्रथम क्रमांकाची कामगिरी केली. तिच्या या यशाबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना,माजी आ. भीमराव धोंडे. यावेळी ज्येष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, प्राचार्य डॉ. खेमगर, प्राचार्य बोडखे, प्रा. ढोबळे, श्री.पवार व इतर मान्यवर**

# आष्टी तालुक्यातील वाळू माफियाची हर्सूल जेलमध्ये रवानगी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ आहे. जिल्ह्यातील गुन्हेगारीचे आणि वाळू माफियांचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने एमपीडीए कायदे अंतर्गत अनेक गुन्हेगारावर आतापर्यंत कारवाई केलेली आहे. आष्टी तालुक्यातील शिराळ येथील शुभम बाळासाहेब कर्डिले यांच्याविरुद्ध अंतर्गत कारवाई करून त्याची संभाजीनगर येथील हर्सूल जेलमध्ये रवानगी करण्यात आली आहे .



आष्टी पोलीस ठाणे अंतर्गत शुभम कर्डिले याच्यावर गंभीर दुखापत करणे, अवैध वाळू वाहतूक व त्याचा साठा करणे अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद पोलीस ठाण्यात आहे. त्याच्यावर पोलिसांची करडी नजर होती. त्याचे वर्तन सुधारावे म्हणून त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. परंतु या कारवाईलांना जुमानता त्याची गुन्हेगारी चालूच होती. आष्टी तालुक्यामध्ये याची प्रचंड दहशत होती. लोक त्याच्याविरुद्ध फिर्याद देण्यास किंवा साक्ष देण्यास समोर येत नव्हते. सर्व सामान्य लोकांना आणि व्यापाऱ्यांना त्रास देऊन तो दहशत निर्माण करत होता. या प्रकरणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी कायद्या अंतर्गत आदेश पारित करून शुभम कर्डिले याला ताब्यात घेऊन हरसुल जेलमध्ये त्याचे रवानगी करावी असे आदेश दिले. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी तात्काळ त्याच्यावर कारवाई करून त्याची रवानगी हरसुल जेलमध्ये करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकांना दिल्या. यावरून त्याला २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन त्याची पोलीस बंदोबस्तात हरसुल कारागृहात रवानगी करण्यात आली. त्याला २५ नोव्हेंबर रोजी दुपारी २.५० वाजता स्थानबद्ध करण्यात आले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे दुबाले, गायकवाड, सानप ,सय्यद ,परजणे सपोउपनि अभिमन्यू अवताडे, आदींनी केली. यापुढेही वाळूचा अवैध चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटखा विक्री करणारे तसेच जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे व्यक्ती याबरोबरच जातीय तेढ निर्माण करणारे समाजकंटक, दादागिरी करणारे खंडनी बहादर अशा गुंडांवर एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

## रामलिंग पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी अरुणराव गुरसाळी यांची निवड



**वडवणी । प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रातील मुकूटमणी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या व वडवणी नगरीचे वैभव असलेल्या रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमन पदाची निवडीची प्रक्रिया नुकतीच संपन्न झाली. यामध्ये या पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी अरुणराव गोविंदराव गुरसाळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी यांचा पतसंस्थेच्या वतीने स्वागत सत्कार करुन अभिनंदन करण्यात आले. तसेच सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

संपूर्ण मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात आपल्या पारदर्शक व तत्पर सेवेतून नावारुपाला आलेल्या तसेच सहकार क्षेत्रातील मुकूटमणी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था म.ता.वडवणी या पतसंस्थेच्या संचालक मंडळाची विशेष सभा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था वडवणी गायकवाड बी.एस. अध्याक्षी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संस्थेच्या उपाध्यक्षाची निवड करण्यासाठी दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरील पदासाठी संचालक नवनाथराव म्हेत्रे यांनी ज्येष्ठ संचालक अरुणराव गोविंदराव गुरसाळी यांचे नाव सुचवले. व त्याला अनुमोदन बाबासाहेब मस्के यांनी दिले. त्यानंतर अरुणराव गुरसाळी यांची सर्व संचालकाच्या अनूमतीने संस्थेच्या उपाध्यक्ष व्हाईस चेअरमन या पदावर बिनविरोध निवड झाली. या वेळी सहकार अधिकारी श्रेणी १ मोहनराव चव्हाण, मुख्य लिपिक आदित्य देशपांडे, सहकार अधिकारी श्रेणी २ मुंडे साहेब, सचिव सेवा सहकारी सोसायटी वडवणी आकेश मुळे, पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव रामभाऊ डिगे, व्यवस्थापक दिगांबर गोविंदराव गुरसाळी साहेब, यांसह माजी चेअरमन कचरुशेठ सखाराम झाडे, माजी व्हाईस चेअरमन सुरेशराव जनार्धन ढवळशंक, सर्वश्री संचालक नवनाथराव नामदेवराव म्हेत्रे, प्रकाशराव पंडितराव डिगे, उपमन्यूराव बळीराम वारे, सुभाषराव दिगांबरराव वाव्हळ, बाबासाहेबराव कारभारी मस्के, सिताबाई रामभाऊ डिगे, रंजनाताई शिवाजीराव टकले, शैलजाताई अर्जुनराव भंडारे उपस्थित होते. त्यानंतर व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी यांनी आपल्या पदाचा पदभार स्विकारला.

## पोपट तोरडमल यांचे अल्पशा आजाराने निधन

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा गावचा सच्चा समाजसेवक पोपटराव तोरडमल काळाच्या पडद्याआड नि: शब्द भावपूर्ण श्रद्धांजली १९९० च्या काळानंतर, आज पर्यंत गावाला आणि परिसरातील लोकांना भेटलेले नेतृत्व म्हणजे पोपटराव तोरडमल, गरिबांच्या सुख दुःखात धावुन येणारा सच्चा समाजसेवक, धार्मिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात ,गाव परिवर्तनाच्या विकासाच्या मुद्द्यावर, शैक्षणिक ,सामाजिक, कौटुंबिक जीवनात एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून पोपटराव तोरडमल नेहमी आठवणीत राहतील. या व अशा नेतृत्व आज काळाच्या पडद्याआड गेलं हे खूप दुःखाची गोष्ट आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो व कुटुंबाला या दुःखातुन सावरण्याचे बळ देवो,हीच ईश्वर चरणी प्रार्थना त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन पत्नी हिराबाई व सविता मुलगा सोमिनाथ व सुना नातवंडे सोबत आई असा परिवार आहे त्यांच्या अचानक जाण्याने सुलेमान देवळा सह संपूर्ण पंचक्रोशीतुन हळहळ व्यक्त होत आहे.



## पान ६ वरुन...

### टक्केवारीवर राजकारण

बबलू खराडे, महिला आघाडीच्या सौ.रत्नमाला मोटे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

या सभेत बोलताना बाळराजे पवार यांनी अमरसिंह पंडित यांच्यावर विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप करत कठोर शब्दांत समाचार घेतला. ते म्हणाले, विकासाची भाषा करणारे बीडचे अमरसिंह पंडित गेवराई तालुक्यातील विकासाचे एक गाव दाखवू शकत नाहीत. एकही पाणी पुरवठा योजना योग्यरित्या सुरू नसताना विकासाची गप्पा मारणे म्हणजे जनतेची थेट फसवणूक आहे. ते पुढे म्हणाले, पोपटपंची करू नका. विकासाची भाषा करता आणि मागच्या बाजूने टक्केवारी खाता. गेवराईच्या जनतेला दाखवायला तुमच्याकडे एकही भरीव काम नाही. तुम्ही गेवराईचे हित साधणारे नाही, तुम्ही लोकांची दिशाभूल करत आहात.

### माझे नाव घेतल्याशिवाय

दादासाहेब चौधरी, रविंद्र बोराडे, भाऊसाहेब नाटकर, दिपक आतकरे, महेश दाभाडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रभागातील सर्व उमेदवार उपस्थित होते. यावेळी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, विरोधकांनी वीस वर्ष नगर परिषदेची सत्ता भोगली त्या काळात यांना विकास कामे करता आली नाहीत, म्हणुन निवडणुक प्रचारा दरम्यान लोकांची दिशाभुल करुन आमच्या नावाने शिमगा करत आहेत. त्यामुळे फक्त लोकांची करमणुक होत असुन नागरीकांना आता शहराचा विकास पाहिजे म्हणुनच आम्ही विकासाच्या मुद्यावर ही निवडणुक लढत आहोत. सत्तेच्या काळातील निष्क्रियतेमुळे पवार आणि बदाम यांना एकत्र येण्याची वेळ आली. दोन्ही विरोधक का एकत्र झाले ? असा सवाल आजही मतदार विचारत आहेत. पत्रकार परिषदेचे संचलन श्रीहरी पवार यांनी केले.

### शेतकऱ्यांच्या हक्कासाठी

करणे म्हणजे शेतकरी चळवळीला कमकुवत करण्याचा प्रयत्न असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गावपातळीवरचे तरुण कार्यकर्ते भीतीपोटी मागे हटावेत, लढण्याची हिंमत हरवावी, यासाठीच हा राजकीय डाव रचल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. मात्र आम्ही घाबरणारे नाही! असा निर्धार पैंजणे समर्थकांनी व्यक्त केला आहे. माजलगावातील तमाम शेतकरी, तरुण व सर्वसामान्य मतदारांवर ही दडपशाहीची हुकूमशाही लादली जात असून येणाऱ्या निवडणुकीत जनतेने अशा कारखानदारांना आणि प्रस्थापितांना योग्य धडा शिकवावा,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पाटोदा तहसीलदार

नाही ही अत्यंत गंभीर व कायदेशीरदृष्ट्या अयोग्य बाब आहे.तहसीलदार दत्ता निलावाड यांच्यावर तात्काळ बडतर्फीची प्रक्रिया सुरू करण्यात यावी.जातवैधता समितीच्या आदेशानुसार गुन्हा तत्काळ नोंदवावा. त्यांच्या सेवेतून मिळालेले सर्व लाभ व पदोन्नती निर्णय रद्द करण्यात यावेत, कारवाईचा अहवाल समितीस व शासनास निर्धारित कालावधीत सादर करावा.ही तक्रार अनिता अनिल वानखेडे यांनी भारतीय संविधानातील कलम १९ (१) (अ) (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) व कलम ५१ (झ) नुसार सार्वजनिक हितासाठी केली असून चौकशी निष्पक्ष,पारदर्शक आणि नियमांनुसार होणे आवश्यक आहे.वरील सर्व बाबींचा विचार करून तहसीलदार दत्ता निलावाड यांच्या विरुद्ध कठोर व तत्काळ कारवाई करण्यात यावी असे सौ.अनिता नितीन वानखडे यांनी दिलेल्या तक्रार निवेदनात म्हटले आहे.

### वडवणी पंचायत समिती

करून त्यांच्या कार्याचा गौरव व सन्मान केला तसेच राज्य समन्वयक श्री.सोनवणे सर,श्री.आघाव सर यांचाही सत्कार त्यांनी सरपंचांच्या वतीने केला. घरकुल योजनेत वडवणी तालुक्याचा प्रथम क्रमांक पटकावल्यामुळे पंचायत समिती कार्यालयात उत्साहाचे वातावरण आहे तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मिळालेला हा मान वडवणी तालुक्याचा अभिमान वाढवणारा ठरला आहे.

## आ.सुरेश धस यांची योगेश सानप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट; राजकीय चर्चांना उधाण

पाटोदा । प्रतिनिधी

अगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीला वेग आले असताना आष्टी–पाटोदा–शिरूर मतदारसंघात महत्त्वाची घडामोड घडली भाजपचे लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस यांनी आपल्या कट्टर समर्थक आणि सक्रिय युवा कार्यकर्ते योगेश सानप यांच्या महासांगवी येथील निवासस्थानी भेट दिली असताना संपूर्ण परिसरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. निवडणुकीच्या तोंडावर झालेली ही भेट साधी भेट नसून भाजपच्या आगामी रणनीतीशी थेट जोडली जात असल्याचे स्थानिक राजकीय जाणकार सांगत आहेत. पारगाव पंचायत समिती गणात उमेदवारीबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये या भेटीमुळे स्थानिक पातळीवरील चर्चा आमदार धस यांनी जर पारगाव पंचायत समिती गणातून योगेश सानप यांना उमेदवारी दिली, तर गणातील राजकीय मांडणी पूर्णपणे बदलू शकते, अशी चर्चा जोर धरत आहे. सानप यांचे तरुणांमध्ये मोठे समर्थन, सक्रिय जनसंपर्क आणि कट्टर कार्यकर्त्यांची साथ यामुळे त्यांचे नाव आघाडीवर येत असल्याचे कार्यकर्ते सांगत आहेत. विरोधकांमध्येही या भेटीमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले असुन या भेटीनंतर पारगाव गणात निवडणुकीचे वातावरण तापले असून, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांमध्ये पुढील घडामोडींबाबत उत्सुकता वाढली आहे. भाजपा कोणाला उमेदवारी देणार आणि मतदारसंघातील पुढील राजकीय समीकरणे कशी बदलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच, आमदार सुरेश धस यांच्या या सदिच्छा भेटीमुळे पारगाव जिल्हा परिषद गटातील राजकीय चित्र बदलण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे.



## सैनिकी विद्यालयात २६ / ११ हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली व संविधान दिन साजरा



बीड । प्रतिनिधी

सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड येथे २६/११ दहशतवादी हल्ल्यातील शहिद जवान, पोलीस आधिकारी व नागरिकांना श्रद्धांजली अर्पन करण्यात आली व संविधान दिन साजरा करण्यात आला असल्याची माहिती प्राचार्य श्री सचिन पवार सर यांनी दिली.

नवगण शिक्षण संस्था राजुरी न संचलित सैनिकी विद्यालय बीड येथे आयोजित कार्यक्रमात सर्वप्रथम महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री. सचिन पवार सर हे होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी संविधान दिनाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य श्री. सचिन पवार सर यांनी संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचे महत्व विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतात व्यक्त केले. संविधान दिनाच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांनी संविधानाची शपथ घेतली व या वेळी मौन राखून शहीदांना श्रध्दांजली अर्पन करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचन श्री. बिभीषण किलमिसे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. शिवाजी सोनवणे सर यांनी केले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

दै.राज्य लोकतंत्र दि.२७/११/२०२५

CHANGE IN NAME

I DECLARED BY THIS PUBLICATION
ABOUT CHANGE IN MY NAME
OLD NAME: DHANSHRI DNYANESHWAR NARWADE
NEW NAME: DHANSHRI SUDHAKARRAO SHINDE
ADDRESS: CANOL ROAD, SANSKAR COLONY, SHINDE NAGAR BEED, MAHARASHTRA 431122
MO.NO. 9403900595

जाहीरनामा

मा.श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड
ता. जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७२४/२०२५
कल्पना कापले वि. निरंक विधीज्ञ श्री. तावरे मी. एन.
**मागणी:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे बारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १) कल्पना भ्र.रघुनाथ कापले, वयः ४४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. आहेरवडगांव, ता. जि. बीड २) ऋतुजा पि. रघुनाथ कापले, ययः २४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. वरील प्रमाणे ३) दिनेश पि. रघुनाथ कापले, वयः २२ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. वरील प्रमाणे ४) लिलावती भ्र. रामभाउ कापले, वयः ७५ वर्षे, धंदा: घरकाम, रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे रघुनाथ पि. रामभाऊ कापले, राहणार आहेरवडगांव, ता. जि. बीड हे दिनांक २२/०७/२००७ रोजी आहेरवडगांव ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी तर अर्जदार क्र. ३ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. ४ ही मयताची आई आहे.

मयत नामे रघुनाथ पि. रामभाऊ कापले, यांचे निधन झालेले आहे मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रघुनाथ पि. रामभाऊ कापले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०६/०१/२०२५ आह.

आज दिनांक २५/११/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

**आदेशावरून**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

# संविधानामुळेच मुलींनी घेतली आकाशात उंच भरारी

## छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड या ठिकाणी संविधान दिनानिमित्त खळगे सरांचे प्रतिपादन

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड या ग्रामीण भागामध्ये,छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचालय या सारखे संस्कार केंद्र वर्षनवर्ष,, विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना, गावातील लोकांना,,समाज बांधवांना,घडवण्याचं काम करत आहे..ग्रामीण भागातील विद्यार्थी सुजाण हुशार व विविध क्षेत्रात त्याने भरारी घ्यावी म्हणून सतत शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे वेगवेगळ्या पद्धतीचे उपक्रम राबवून प्रभावित केले जाते... या संस्कार केंद्रामध्ये वर्षभर संस्काराचे धडे दिले जातात..सर्वच महापुरुषांच्या जयंती, सर्वच महापुरुषांच्या वेगवेगळ्या महत्त्वाच्या दिनाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबवले जाते. व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेतले जाते.. सर्व महापुरुषांच्या विचारावर त्यांना बोलायला संधी दिली जाते. विविध गुण दर्शनाचे कार्यक्रम आयोजित करून प्रत्येक विद्यार्थ्यांना त्या उपक्रमात सहभाग नोंदवण्याचे आव्हान ग्रंथालय कर्मचारी सौ.शिलाताई सुखदेव उजगरे व अंगणवाडी ताई श्रीमती अग्नी अण्णाभाऊ खळगे सतत करत असतात.. नुकतेच आज सकाळी ११ वाजता वाचनालयाच्या प्रांगणामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान आज देशाला अर्पण करण्यात आलेले आहे.. म्हणून त्याचे महत्त्व,,त्याचे उद्देश,, त्याचे कर्तव्य आणि त्याची जबाबदारी लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व विचार प्रभावीपणे मांडले,, शाळेतील शिक्षक शिक्षिका यांनी पण संविधान या विषयावर आपले मत व्यक्त केले.. यानिमित्त वाचनालयाचे सचिव खळगे सर यांनी सदरील कार्यक्रमाला संबोधित करत असताना सांगितले की,, भारत देश हा संविधानामुळे खूप प्रगतीपथावर गेलेला आहे.. संविधानामुळे संपूर्ण मानव जातीला एक योग्य दिशा मिळालेली आहे . तळागाळातील समाज स्वाभिमानाने जीवन जगू लागला आहे प्रत्येकाला आपल्या अस्तित्वाची जाणीव संविधानाने करून दिलेली आहे म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे प्रभावी विचार प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजलेले आहेत विशेषतः मुलींमध्ये प्रचंड शिक्षणाची आस निर्माण झालेली असून, प्रत्येक क्षेत्रामध्ये,, मुली, आघाडीवर आहेत. जी स्त्री चूल आणि मूल, घर आणि घरातील संसार, यामध्ये अडकलेली होती. तीच मुलगी तीच स्त्री आज विदेशामध्ये अंतराळामध्ये, संविधानाच्या प्रभावामुळे उंच उंच भरारी घेत आहे.., बाबासाहेब आंबेडकरांनी, समता स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची शिकवण देत असताना, संविधानामध्ये एक मुद्दा महत्त्वाचा पटवून दिलेला आहे. की जो शिक्षण घेईल तो नक्कीच उंच पदावर जाईल. जो पुस्तके वाचशील त्याची फार मोठ्या प्रमाणामध्ये प्रगती होईल..ज्यांनी ज्यांनी हा समतेचा संदेश वाचला ऐकला.त्यांचे खरंच खूप सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती झालेली आहे. आणि संविधानामुळे प्रत्येक व्यक्ती आज सुरक्षित आहे.म्हणून सर्वांनी या संविधानाचे जतन करावे. प्रत्येकाला संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी तरुण आणि तरुणी यांनी पुढे यावे. आपल्या देशासाठी,समाजासाठी, आपल्या स्वतःच्या हितासाठी संविधानाचे रक्षण करावे..व जास्तीत जास्त विद्यार्थी विद्यार्थिनीने आपली प्रगती करून घ्यावी अशी कळकळीची विनंती यानिमित्त सर्व उपस्थित असणाऱ्या समुदायांना खळगे सरांनी केले.. विशेषतः मुलींना या संस्कार केंद्रामध्ये विशेष प्राधान्य दिले जाते..या संस्कार केंद्रामध्ये महिला कर्मचारी प्रभावीपणे सतत कार्यरत असल्यामुळे,मुलींची फार मोठ्या प्रमाणामध्ये या संस्कार केंद्राकडे येण्याची आस वाढलेली आहे.. आज मुलींनी रांगोळी स्पर्धा,, गायन स्पर्धा, वाचन स्पर्धा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर, विचारावर व शिक्षणावर, प्रभावीपणे विचार मांडले.यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे... या संस्कार केंद्राचा सर्वांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा अशी आवाहन खळगे सर यांनी व्यक्त केले..या कार्यक्रमाच्या निमित्त शाळेतील शिक्षक परिसरातील वाचक वर्ग यांनी भरभरून प्रतिसाद दिला..कार्यक्रमाची शोभा वाढवली. यानिमित्त सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले. सर्वांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.





cmyk

# आयात धोरण शेतकरी, ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने समतोल हवे- कृषिमंत्री चौहान


दिल्ली । वृत्तसंस्था

**शेती उत्पादनांसाठी सरकारचे आयात धोरण शेतकरी आणि ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने समतोल असायला हवे; जेणेकरून शेतमालाच्या घसरलेल्या किमतींमुळे शेती उत्पन्नावर परिणाम होण्याची परिस्थिती वारंवार उद्भवणार नाही, असे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे.**

''आम्ही अशा धोरणाचा अवलंब करतो जिथे कडधान्ये आणि तेलबियांसारख्या वस्तूंचे भाव इतके वाढू नयेत की सामान्य माणसाला त्या खरेदी करणे शक्य होणार नाही. जेव्हा देशांतर्गत उत्पादकतेवर परिणाम होतो. तेव्हा आम्ही स्वस्त आयातीचा पर्याय शोधतो,'' असे चौहान यांनी एका कार्यक्रमात बोलताना सांगितले. देशात आयात वाढल्याने देशांतर्गत किमतीत लक्षणीय घट होते. पण याचा फटका शेतीच्या उत्पन्नाला बसतो. त्यासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास किफायतशीर भाव देण्याची तातडीने गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कडधान्यांच्या किमतीत होणारी घसरण रोखण्यासाठी, सरकारने नुकतेच अन्न प्रक्रिया उद्योगात वापरल्या जाणाऱ्या पिवळ्या वाटाण्यांवर ३० टक्के आयात शुल्क लागू केले. आम्ही इतर कडधान्यांवरही आयात शुल्क लागू केले. तसेच तांदळावरील निर्यातबंदी उठवली आणि कांद्यावरील निर्यातशुल्क हटवले, असे चौहान यांनी नमूद केले. शेतकऱ्यांना अधिक कडधान्ये आणि तेलबिया पिके घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असून, ज्यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल, असे चौहान म्हणाले. गेल्या वर्षीपासून सरकार आवश्यकतेनुसार किंमत आधार योजनेअंतर्गत तूर, उडीद आणि मसूर आदी कडधान्ये आणि सोयाबीन, भुईमूग आणि मोहरी यासारख्या तेलबियांची १०० टक्के खरेदी करण्यास वचनबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले. शेतमालांच्या खरेदीबद्दल बोलताना चौहान म्हणाले की, मध्य प्रदेशच्या भावांतर योजनेप्रमाणेच राज्यांनी किंमत तूट भरपाई योजना सुरू करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. जिथे सरकार शेतकऱ्यांना बाजारातील प्रचलित कमी भाव आणि किमान आधारभूत किंमत यांच्यातील फरक देऊन भरपाई देते. या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



# 'नायजेरियन ड्वार्फ' या जातीची शेळी देते बंपर उत्पादन



**शेळीच्या ठेंगण्या किंवा लहान जातीचे पालन करण्याची क्रेझ शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे. कारण या शेळ्यांची काळजी घेण्यासाठी फारशी मेहनत घ्यावी लागत नाही. आणि या शेळ्या कमी खर्चात सुद्धा चांगला नफा देतात. अशीच एक शेळीची जात आहे 'नायजेरियन ड्वार्फ'. शेळीची ही जात दिसायला अगदी लहान असली तरी नफा देण्याच्या दृष्टीने इतर जातीच्या शेळ्यांपेक्षा खूपच सरस आहे, आणि या शेळ्यांच्या संगोपनात फारसा पैसा खर्च करावा लागत नाही. जाणून घेऊ शेळीच्या या जातीविषयी सविस्तर माहिती.**

**शारीरिक ठेवण** : नायजेरियन ड्वार्फ शेळी ही पश्चिम आफ्रिकन वंशाची शेळीची जात आहे. या शेळ्या खूप मजबूत आणि काटक असतात. या शेळ्या सुमारे १० वर्षे जगतात. नावाप्रमाणेच या शेळ्या उंचीला ठेंगण्या आणि काळ्या, पांढऱ्या, तपकिरी, लाल आणि सोनेरी अशा विविध रंगात असतात. पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे सरासरी वजन १७ ते २५ किलोपर्यंत असते, लांबी २४ ते ३० इंच असते आणि उंची १६ ते २० इंच असते.

**प्रजोत्पादन माहिती :**

नायजेरियन ड्वार्फ शेळ्यांचा प्रजनन दर इतरांपेक्षा जास्त असतो. ते वर्षभर प्रजनन करू शकतात. एक शेळी सरासरी २ ते ४ पिलांना जन्म देते. ते साधारण ६ ते ७ महिन्यांत माजावर येतात आणि दूध देऊ लागतात. या शेळ्यांचा गर्भधारणा कालावधी १४५ ते १५३ दिवसांचा असतो.

**सर्वाधिक दूध उत्पादन क्षमता :**

नायजेरियन ड्वार्फ शेळी ही मांस आणि दूध उत्पादनासाठी सर्वोत्तम जात मानली जाते. इतर शेळ्यांच्या शरीराच्या आकाराच्या तुलनेत जास्त दूध उत्पादक आहेत. ही शेळी दररोज १.८ ते २ लिटर दूध देते. याशिवाय त्याचे मांसही बाजारात चांगल्या दराने विकले जाते. त्यांचे पालन करून शेतकरी बांधव दर महिन्याला बंपर नफा मिळवू शकतात.

**संगोपन :**

या शेळ्यांसाठी तुम्ही बांधलेले आवार अतिशय स्वच्छ असावे. वेंटिलेशन प्रणाली आणि सांडपाण्याचा प्रवाह चांगला असावा. शेळ्यांना पुरेशा प्रमाणात पोषक आहार देण्याचा प्रयत्न करा. त्यांना हिरव्या भाज्या खाऊ घालणे खूप फायदेशीर आहे. याशिवाय या शेळ्यांना पुरेसे पाणी द्यावे लागते.

# मातीपरिक्षण करण्याची नेमकी वेळ



**अनेक शेतकरी माती परिक्षण करतात. पण काही शेतकरी माती परिक्षण वेळवर करत नाहीत तर काही शेतकऱ्यांना आपण मातीपरिक्षण नेमक कोणत्या उद्देशानं करतोय हेच माहीत नसत. त्यामुळे माती परिक्षणाचा म्हणावा तसा फायदा होत नाही.**

माती परीक्षण आपण नेमक्या कोणत्या उद्देशाने करणार आहोत, हे माहिती असले पाहिजे. कारण उद्देशानूसार माती परिक्षणाचा नमुना घेण्याची पद्धत ही वेगवगळी असते. त्यानुसार शेतातून मातीचा नमुना घेण्याची पद्धत ठरवावी लागते. शेतामधील माती साधारणतः तीन उद्देशांसाठी तपासली जाते. यामध्ये

पहिला उद्देश म्हणजे विविध हंगामी पिके म्हणजे तुम्ही जर अन्नधान्य पिके, भाजीपाला किंवा फुल पिके जर घेणार असाल तर या पिकाच्या खत नियोजनाच्या दृष्टीने माती परिक्षण कराव लागते. तुम्ही जर बहूवर्षीक म्हणजे लिंबू, आंबा, डाळिंब, पेरू, सीताफळ आणि चिकू यासारखी फळपिके घेणार असाल तर या फळपिकांच्या खत नियोजनासाठी माती परिक्षण करावं लागत. हा झाला दुसरा उद्देश. आणि मातीपरिक्षणाचा तिसरा उद्देश म्हणजे तुम्ही जर नविन फळबागेची लागवड करणार असाल तर त्यासाठी आपली जमीन योग्य आहे किंवा नाही हे तपासण्याची गरज असते. या उद्देशानूसार मातीपरिक्षणाचा नमुना घेऊन मातीपरिक्षण केले तर त्याचा नक्कीच फायदा होतो.

**मातीचा नमुना घेण्याची वेळ :**

मातीचा नमुना शक्यतो खरीप किंवा रब्बी पिकाच्या काढणीनंतर जमीन नांगरणी करण्याआधी आणि कोरडी असताना घ्यावा. कारण माती परीक्षण अहवाल पुढील हंगामातील पेरणीपूर्वी उपलब्ध होणे गरजेचे आहे. म्हणजे त्यानुसार खतांचे नियोजन करणे सोपे जाते. प्रयोगशाळेत नमुना दिल्यानंतर साधारणपणे अहवाल मिळण्यासाठी एक महिन्याचा वेळ लागू शकतो.ते गृहीत धरून मातीचा नमुना प्रयोगशाळेत परीक्षणासाठी पाठवावा. माती परिक्षणाच्या प्रयोगशाळा जवळचे कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र याठिकाणी असतात. या ठिकाणी माफक शुल्कामध्ये माती परिक्षण करून अहवाल मिळतो. काही शहरामध्ये खासगी प्रयोगशाळेतही मातीपरीक्षण करुन मिळत. माती परिक्षणाचा अहवाल मिळाल्यानंतर तो त्या ठिकाणच्या शास्त्रज्ञांकडून समजून घ्यावा. विशेष करुन आपण कोणती पिके घेणार आहोत त्यानूसार खत नियोजनाची माहिती घेण्याचा प्रयत्न करावा.

**वैधतेचा कालावधी :**

माती परीक्षण अहवालाची वैधता ही साधारणपने दोन ते तीन वर्षांपर्यंत असते. त्यानंतर पुन्हा माती परिक्षण करावे. यामध्ये पाण्याची सोय असलेल्या शेतात वर्षातून दोन किंवा जास्त हंगामात पिके घेत असाल तर अशा शेताचे माती परीक्षण दर दोन वर्षांनी करावे. आणि जर तुम्ही वर्षातून फक्त एकाच हंगामात पीक घेत असाल तर अशा शेताचे दर तीन वर्षांनी माती परीक्षण करावे. अशा प्रकारे योग्य वेळी मातीपरिक्षण करुन मातीपरिक्षणाचा अहवाल समजून घेऊन खत नियोजन केल तर मातीपरिक्षणाचा नक्कीच फायदा होतो.

# आष्टीच्या शेतकऱ्याची केळी थेट ईराणला



आष्टी । प्रतिनिधी

जिद्द, चिकाटी आणि शेतीला जर नविन तंत्रज्ञानांची जोड दीलयास शेती व्यवसायात देखील मोठे उत्पन्न मिळु शकते हे ताजे उदाहरण आहे. कठोर मेहनत या त्रिसूत्रीच्या बळावर, आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी येथील एका प्रगतिशील शेतकऱ्याने मोठे यश संपादन केले आहे. आष्टी शहरातील व्यापारी तथा प्रगतिशील शेतकरी हरुण शेख यांच्या कष्टाला अखेर चीज झाले असून, त्यांच्या शेतीत पिकलेली उच्च प्रतीची केळी थेट इराणच्या बाजारपेठेत निर्यात झाली आहेत.

**शेतकऱ्यांसाठी प्रेरणा**

> तीन एकर जमीनीत ३००० झाडे लावून २०. टन केळीची यशस्वी निर्यात केली. शेतकरी हरुण शेख यांनी कष्ट आणि मेहनतीच्या जोरावर तांत्रिक बाबींचा वापर करत २० टन केळीचे उत्पादन काढले. दरात घसरण होऊनही त्यांना यातून अल्पभावाप्रमाणे पाच लाख रुपये उत्पन्न मिळाले. केळी बागेचा हा यशस्वी प्रयोग इतर शेतकऱ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरू शकतो.

आष्टी शहराजवळ हारुण शेख यांनी ३ एकर जमिनीमध्ये एक वर्षापूर्वी ''बी-किसान'' या वाणाच्या सुमारे ३००० केळीच्या रोपांची लागवड केली होती. ही रोपे त्यांनी मध्य प्रदेशातून उपलब्ध केली होती. आष्टीची केळी इराणमध्ये पाठविण्यासाठी पॅकिंग केली जात आहे. सध्या ही केळी बाग उत्तम बहरली आहे. या तीन हजार झाडांना ५० टन निर्यातक्षम दर्जाची केळी अपेक्षित आहे. शेख हरुण यांच्या या केळी बागेतील दर्जेदार २० टन केळी थेट परदेशात, म्हणजेच इराणच्या बाजारात पोहोचली आहे. या केळी बागेसाठी त्यांना सुमारे ५ लाख रुपये खर्च आला आहे. बागेपासून सुरुवातीला त्यांना २५ लाख रुपये उत्पन्न अपेक्षित होते. मात्र, केळीच्या दरात मोठी घसरण झाल्यामुळे, त्यांना केवळ पाच लाख रुपयांचा नफा मिळण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

# रब्बी हंगामात घ्या लसूनचे उत्पादन अन् मिळवा मोठे उत्पन्न

**रब्बी ज्वारी, हरबरा, जवस, करडई, गहू इत्यादी पिकांसह या हंगातामात राज्यातील शेतकरी कमी अधिक प्रमाणात लसूण पिकाची लागवड करतात. या पिकातुन चार महिण्यात चांगले उत्पादन व पैसाही मिळतो. काढणीनंतर वर्षभर या चांगला भाव मिळेपर्यंत साठवणही करता येते.**

**जमिनीची निवड :**

लसूणाचे कंद जमिनीत वाढत असल्याने पाण्याचा उत्तम निचरा होणारी भुसभुशीत कसदार जमीन या पिकासाठी निवडावी.

**हवामान :**

लसूण लागवड करण्यासाठी थंड हवामान लागते. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात लागवड करावी. लसूण पक्व होत असताना व काढणीच्या काळात कोरडे हवामान आवश्यक आहे.

**पिकाची जात :**

फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, श्वेता, यमुना सफेद, फाउंलाईट इत्यादी.

**लागवड पद्धत :**

लसूणाची लागवड सपाट वाफ्यात करावी. कारण लसून जमिनीत खोल वाढतो. जमिनीत कुजलेले शेणखत २५ ते ३० टन मिक्स करून घ्या व जमिनीच्या उतारानुसार वाफे बांधावी ४२/३२ मीटर अंतरावर सपाट वाफे करावीत. जमिनीला जास्त उतार असेल तर १.५ २ मीटर रुंद १२ सेमी लांबीचे वाफे करून लागवड करावी. सपाट वाफे ची रुंदी १५ सेमी अंतरावर खुरप्याच्या साह्याने रेघा पाडून



त्यांत १० सेमी अंतरावर उभ्या पाकळ्या रोवून मातीने झाकाव्यात. लागवडीच्या वेळी बियाणे दहा लिटर पाण्यात २० मिली कार्बोसल्फान व १५ गरम कार्बनडाझिम च्या द्रावणात दोन तास बुडवून लागवड करावी.

**खत व्यवस्थापन :**

लागवडीच्या वेळी कुजलेले शेणखत २५ ते ३० टन जमिनीत मिसळावे.१०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावीत. नंतर उरलेली दुसरी नत्राची मात्रा दोन वेळा विभागून द्या. पहिली मात्रा लागवडीनंतर ३० दिवसांनी, दुसरी मात्रा लागवडीनंतर ४५ ते ५० दिवसांनी तसेच लागवडीच्या वेळी अमोनियम सल्फेट व सिंगल सुपर फॉस्फेट या खताचा उपयोग केल्यास गंधकाची मात्रा तयार होते.

**पाणी व्यवस्थापन :**

लसणाची लागवड केल्यानंतर लगेच पाणी द्याव.आंबवणी चार ते पाच दिवसांनी द्यावी. लसणाची मुळे १५ ते २० या थरात असतात त्यामुळे वरच्या थरात ओलावा असणे आवश्यक आहे .या पिकास आवश्यकतेनुसारपाणी द्यावे. पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.

**किडी :**

फुल किडी ही नुकसानकारक किड आहे. सकाळी किंवा रात्रीच्या वेळी आक्रमण करते .ही पानावरील रस शोषून करते त्यामुळे पात पांढरी पडून वाकडी होते. पात वाकडी झाल्यास लसनाचे पोषण होत नाही. उपाय -,दहा लिटर पाण्यात स्टिकर घेऊन + कार्बोसल्फान २० मिली+ सापर मिथ्रीन १० मिली घेऊन फवारणी करावी.

**करपा :**

करपा हा बुरशीजन्य रोग आहे. या रोगामुळे पानं पिवळी पडतात आणि पानावर चट्टे वाढतात. पाने सुकतात. उपाय - २५ ते ३० मिलि डायथेन ४५ आणि कार्बनडाझिम २० मिली गरम स्टिकर १५ मिली घेऊन फवारणी करावी.

**कंदकूज :**

ही बुरशी लसनामध्ये वाढते ही बुरशी आत शिरल्याने पाकळ्या मऊ होतात व काळया रंगाचा थर जमा होतो. उपाय - निरोगी बियाणे वापरावे लागवडीच्या वेळी वापरत भरपूर पाणी द्यावे.

**हेक्टरी किती उत्पादन मिळते :**

लसणाची पीक १२० ते १३० दिवसांत काढणीस तयार होते. लसणाची वाढ झाली की पानांची वाढ थांबते .पाने पिवळी पडतात. पाने वाळण्यापूर्वी काढणी करावी. जेणेकरून पेढी बांधणे सोपे जाईल .लसूण खुरप्याने किंवा कुदळीच्या सहाय्याने काढणी करावी .लसुन दोन दिवस शेतात तसाच ठेवावा ,पातीने योग्य झाकावा. त्यानंतर जुड्या बांधणी करावी व झाडा खाली किंवा घरात वर बांधाणी करावी. हेक्टरी उत्पन्न १० ते १५ टन मिळते.

**तणनाशक :**

लसन लागवडी पुर्वी कोरड्या जमीन असताना, तयार वाफ्यावर पेंडामेथिलीन या तणनाशकाची प्रतिपंप ८० मिली याप्रमाणे फवारणी करावी. यानंतर लसनाच्या पाकळ्यांची लागवड केली असता, तणाचा बंदोबस्त करता येतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२० : पोर्तुगीज प्रवासी फर्डिनांड मॅगेलन याने प्रशांत महासागराला पार करण्याची सुरुवात केली होती.
१६१२ : गॅलिलिओ गॅलिली याने प्रथमच नेपच्यून या ग्रहाचा शोध लावला. मात्र तेव्हा त्याला तो तारा आहे.
१६६० : मध्ये लंडन ला रॉयल सोसायटीचे गठन झाले होते.
१८१४ : द टाइम्स ऑफ लंदन या वृत्तपत्राला पहिल्यांदा स्वयंचलित प्रिंटींग मशीन ने छापल्या गेले होते.
१८२१ : पनामा ने स्पेन पासून स्वतंत्र होण्याची घोषणा केली.
१८३६ : स्पेनने मेक्सिकोच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८८५ : मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना
१८९३ : न्यूझीलंड मध्ये पहिल्यांदा महिलांनी मतदान केले होते.
१८९५ : ऑगस्टा व लुई या ल्युमियर बंधूंनी पॅरिस येथे चित्रपटाचा जगातील पहिला खेळ सादर केला. या खेळाचे तिकीट होते एक फ्रँक. पहिल्या खेळाचे उत्पन्न आले फक्त ३५ फ्रँक. मात्र नंतर तो खेळ एवढा लोकप्रिय झाला की आठवडाभरातच त्याचे दिवसाला २० खेळ होऊन दिवसाला २००० फ्रँक एवढे भरघोस उत्पन्न मिळू लागले. ल्युमिअर बंधू
१९३८ : प्रभात चा माझा मुलगा हा चित्रपट रिलीज झाला.
१९५६ : मध्ये याच दिवशी चीनचे प्रधानमंत्री चाऊ एन-ली भारताच्या दौर्यावर आले होते.
१९६४ : नासा चे मरीनर-४ हे अंतराळयान मंगळाच्या मोहिमेवर निघाले.
१९७५ : वेस्ट इंडीज चे प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू मायकेल होल्डिंग यांनी आजच्या दिवशी कसोटी सामन्यात डेब्यू केला होता. त्यांनी ६० कसोटी सामन्यात २४९ विकेट तर १०२ एकदिवसीय सामन्यात १४२ विकेट घेतल्या होत्या.
१९९० : मध्ये जॉन मेजर हे युनायटेड किंगडम चे प्रधानमंत्री बनले होते.
१९९६ : कप्तान इंद्राणी सिंग ऐरबेस ए-३०० विमानाला कमांड देणारी पहिली महिला ठरली.
१९९७ : भारताचे माजी प्रधानमंत्री आय.के.गुजराल यांनी राजीनामा दिला.
१९९९ : पाकिस्तान ला हरवून दक्षिण कोरियाने आशिया विश्वचषक आपल्या नावावर केला होता.
२००० : तेलगू भाषेतील महाकवी गुर्रम जाशुवा यांच्या नावाने दिला जाणारा साहित्य पुरस्कार कवी नारायण सुर्वे यांना जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५३ : डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला हेलन व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑक्टोबर १९४४)
१८५६ : वूड्रो विल्सन - अमेरिकेचे २८ वे राष्ट्राध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ३ फेब्रुवारी १९२४)
१८५७ : स्पेनचा राजा अल्फान्सो (बारावा) यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १८८५)
१८७२ : गायक नट रामकृष्णबुवा वझे यांचा जन्म. (मृत्यू: ५ मे १९४३)
१८९९ : गजानन त्र्यंबक तथा ग. त्र्यं. माडखोलकर - कादंबरीकार, समीक्षक आणि पत्रकार (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९७६)
१९११ : फणी मुजुमदार - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक. दूरदर्शनवर लोकप्रिय झालेल्या 'रामायण' या मालिकेची पटकथा त्यांनी लिहिली होती. चित्रपटसृष्टीतील सहा दशकांच्या वाटचालीत त्यांनी केवळ हिन्दीतच नव्हे तर चिनी, बंगाली, मल्याळी, उडिया व इंग्रजी चित्रपटांच्या निर्मितीत मोठे नाव कमावले. (मृत्यू: १६ मे १९९४)
१९२६ : हुतात्मा शिरीषकुमार (मृत्यू: १० ऑगस्ट १९४२)
१९२७ : प्रसिद्ध हाडांचे डॉक्टर प्रमोद करण सेठी यांचा जन्म.
१९३२ : धीरुभाई अंबानी - उद्योगपती (मृत्यू: ६ जुलै २००२)
१९३७ : रतन टाटा - उद्योगपती
१९४० : ए. के. अँटनी - भारताचे परराष्ट्रमंत्री अरुण जेटली केंद्रीय मंत्री व वकीलअरुण जेटली केंद्रीय मंत्री व वकील
१९४५ : वीरेंद्र - नेपाळचे राजे (मृत्यू: १ जून २००१)
१९४५ : हिंदी साहित्यकार तसेच पत्रकार अमर गोस्वामी यांचा जन्म.
१९५२ : अरुण जेटली - केंद्रीय मंत्री व वकील
१९६४ : भारतीय अमेरिकन वकील आणि राजकारणी मायकल बेनेट यांचा जन्म.
१९८७ : अर्जुन पुरस्काराने सन्मानित अभिलाषा म्हात्रे यांचा वाढदिवस.
१९८८ : भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री यामी गौतम यांचा वाढदिवस

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६३ : फ्रॅन्सेस्को मारिया ग्रिमाल्डी इटालियन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २ एप्रिल १६१८)
१८९० : महाराष्ट्राचेथोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचे निधन.
१८९३ : ब्रिटिश अधिकारी सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांचे निधन. (जन्म: २३ जानेवारी १८१४)
१९३१ : आबालाल रहमान - चित्रकार (जन्म: १८६०)
१९३९ : बास्केटबॉल चे निर्माते जेम्स नेस्मिथ यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १८६१)
१९५४ : भौतिक शास्त्राचे शास्त्रज्ञ एनरिको फर्मी यांचे निधन.
१९६२ : बंगाल चे दृष्टिहीन गायक के.सी.दे यांचे निधन.
१९७७ : सुमित्रानंदन पंत - छायावादी विचारधारेतील हिन्दी कवी (जन्म: २० मे १९००)
१९९४ : चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांचे निधन.
१९८१ : हिन्दी चित्रपटांत चार दशके चरित्र अभिनेत्याच्या भूमिका करणारे डेविड अब्राहम चेऊलकर तथा डेविड यांचे कॅनडातील टोरांटो येथे निधन झाले.
१९८९ : हिंदी भाषेचे कादंबरीकार देवनारायण द्विवेदी यांचे निधन.
२००० : मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे - तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष (जन्म: २४ जानेवारी १९२४ वेंगुर्ला)
२००१ : नाटक निर्माते अनंत काणे यांचे निधन.
२००६ : प्रभाकर पंडित - संगीतकार व व्हायोलिनवादक (जन्म: ३० सप्टेंबर १९३३)
२००८ : भारतीय हवलदार गजेन्द्र सिंग यांचे निधन.
२००८ : भारतीय सैनिक संदीप उन्नीकृष्णन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १९७७)
२०१२ : अमेरिकन लेखक झिग झॅगलर यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १९२६).



राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत



# तब्बल ४४ लिटर दूध देणारी मुरूमची गाय राज्यात अव्वल!

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते सन्मान

लातूर । प्रतिनिधी

मुरूम येथील श्वेता बापुराव पाटील यांच्या एचएफ गायीने राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांना मागे टाकत नागपूर येथे झालेल्या ॲग्रो-व्हिजन आयोजित दूध उत्पादन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. ४४ लिटर दूध देणारी ही गाय राज्यात अव्वल ठरली आहे.

निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या अडचणीत जात असताना शेतीला पूरक व्यवसायाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी केंद्र सरकार आणि मदर डेअरी विविध योजना राबवत आहेत.



अँग्रोव्हिजन या उपक्रमाचा भाग म्हणून गेल्या दहा वर्षांपासून कृषी प्रदर्शनांचे आयोजन केले जात आहे. जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील यांना राजकारणासोबतच पशुपालनाचीही आवड आहे. कोरोनाच्या काळात त्यांच्या कन्या श्वेता पाटील यांनी दुग्ध व्यवसायास सुरुवात केली. सुरुवातीच्या आठ एचएफ गायींपासून सुरू झालेला हा गोठा आज ७० गायी आणि २५ म्हशींपर्यंत विस्तारला आहे. मदर डेअरीच्या राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांच्या ४४ लिटर दूध देणाऱ्या एचएफ गायीने प्रथम क्रमांक मिळवून गोठ्याची गुण-वत्ता सिद्ध केली. पाटील कुटुंबाचे दुग्ध उत्पादन क्षेत्रातील हे यश आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते श्वेता पाटील यांच्या प्रतिनिधी नागवेणी पाटील यांचा १५ हजार रुपयांचा धनादेश, मदर डेअरीची ट्रॉफी आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास कृषी मंत्री दत्ता भरणे, मंत्री पंकजा मुंडे, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, डॉ. पंकज भोयर व एनडीबीबीचे डॉ. मनीष शहा यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. मुरूम आणि परिसरातील अनेक युवक दुग्ध व्यवसाय शिकण्यासाठी पाटील यांच्या शेताला भेट देतात. गोठा व्यवस्थापन, चारापाणी नियोजन आणि दैनंदिन देखभाल याबाबत माहिती देत बापुराव पाटील हे पशुपालन व दुग्ध व्यवसायासाठी उपलब्ध योजनांचे मार्गदर्शन करून तरुणांना जोडधंद्याकडे वळविण्याचे काम करीत आहेत.

# प्रभाग ५ मधून सागर नामदे व समीक्षा बियाणी या उमेदवारांना स्थानिकांचा मोठा प्रतिसाद



**दोन्ही उमेदवार लहानपणापासून मतदारांचे**

**अनेक कुटुंबांशी जवळीक आहे. ५ प्रभागातील स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, समाजिक सुविधा अशा अनेक प्रश्न मार्गी लावणार आहे पुढील काही दिवसांत प्रचार आणखी गती घेईल आणि त्यांचा विजय निश्चित होईल असे एकंदरीत चित्र प्रभागात दिसून येते.**

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ५ मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) उमेदवार सागर बबन नामदे,समीक्षा कैलास बियाणी, अध्यक्षपदासाठी श्रद्धा शिवप्रसाद चांगले यांना शहरांमध्ये मतदाराकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. ५ प्रभागातील निवडणूक - वातावरणात त्यांच्या उमेदवारीची व्यापक चर्चा सुरु झाली आहे. स्थानिकांमध्ये विविध प्रश्नांवर उमेदवारांविषयी अपेक्षा आणि उत्सुकता दिसून येत आहे. सागर नामदे, समीक्षा बियाणी हे दोन्ही उमेदवार निवडणूक प्रचारामध्ये सक्रिय भूमिका बजावत असून अनेक ठिकाणी ते संपर्क मोहिमा, बैठका आणि नागरिकांशी संवाद साधताना दिसत आहेत. त्यांच्या या सहभागामुळे प्रचार अधिक वेगात सुरु असल्याचे स्थानिकांचे मत आहे. प्रभागातील मतदारांमध्ये या उमेदवारीबाबत सकारात्मक चर्चा ऐकायला मिळत असून प्रचाराच्या सुरुवातीपासूनच त्यांच्या नावाबाबत उत्सुकता दिसत आहे. प्रभागातील सध्याचे वातावरण निवडणुकीच्या दृष्टीने रंगतदार बनत चालले आहे. नामदे व बियाणी यांच्या व्यक्तिमत्त्वाबाबत प्रभागात विविध स्तरांवर बोलले जाते. साधारण कुटुंबात वाढलेला आज स्थानिकांमध्ये मेहनती तरुण म्हणून ओळखला जातो. ५प्रभागातील रोजच्या प्रश्नांपासून ते प्रशासनाशी निगडित अडचणीपर्यंत विविध विषयांवर ते नागरिकांशी संवाद साधताना दिसून येत आहे .

# संवाद सत्रांमुळे व्यापाऱ्यांच्या समस्यांवर उपाय शोधणे शक्य होते-सतीश पंच

जालना । प्रतिनिधी

जालना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डातील होलसेल किराणा मार्केटमध्ये सोमवार दि. २५ नोव्हेंबर रोजी जालना आयकर विभागाचे अधिकारी विवेक कुमार, निरीक्षक शमशाद अहमद आणि विभागातील इतर पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यापारी-आयकर संवाद संमेलन उत्साहात पार पडले.

याप्रसंगी कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच, मराठवाडा प्रदेशाध्यक्ष हस्तीमल बंब तसेच होलसेल किराणा संघटना व विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. आयकर अधिकारी विवेक कुमार आणि निरीक्षक शमशाद अहमद यांनी नवीन करप्रावधानांविषयी सविस्तर माहिती दिली. अडव्हान्स टॅक्सची गरज



आणि फायदे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, सरकारी प्रणाली आता डिजिटलरीत्या जोडली गेली आहे; कर चुकवणे जवळपास अशक्य झाले आहे. त्यामुळे वेळेवर कर भरून आणि योग्य दस्तऐवज ठेवून व्यापाऱ्यांनी निश्चिंत व्यापार करावा. सभेत काही व्यापाऱ्यांनी चुकीच्या डिडक्शन किंवा कर कमी दाखवल्याने मिळणाऱ्या नोटिसांबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यास उत्तर देताना आयकर अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, चुकीची माहिती देऊन कर टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. या संवादात बोलताना सतीश पंच म्हणाले की, २०१४ ते २०२५ या कालावधीत कर भरणाऱ्यांचे प्रमाण १.५ टक्क्यांवरून वाढून तब्बल ६.५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. कर प्रणाली सुलभ होत असल्याने व्यापाऱ्यांमध्ये कर-जागरूकता वाढताना दिसत आहे. या वाढीमध्ये केंद्र सरकारच्या योजनांचा आणि आयकर विभागाच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा संवाद सत्रांमुळे व्यापाऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे शक्य होते. अशा प्रकारची चर्चा पारदर्शक आर्थिक व्यवहारांची पायाभरणी करते आणि व्यापार व अर्थव्यवस्थेला नवी दिशा देते, असे त्यांनी ठामपणे म्हटले. भविष्यातही अशा संवाद बैठकींचे आयोजन सातत्याने होणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

# जिल्हा परिषदेचे नऊ शिक्षक तडकाफडकी निलंबित

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या नऊ शिक्षकांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. सार्वत्रिक बदली प्रक्रियेत खोटी माहिती दिल्याच्या कारणावरून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी मंगळवारी ही कारवाई केली. त्यामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषदेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात साडेआठ हजार शिक्षक कार्यरत आहेत. या शिक्षकांच्या सार्वत्रिक बदल्यांची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आली. त्याआधी संवर्ग एक आणि संवर्ग २ मधील बदल्यांसाठी शिक्षकांकडून पोर्टलवर माहिती भरून घेण्यात आली होती. मात्र यामध्ये अनेक शिक्षकांनी चुकीची आणि खोटी माहिती भरली. याबाबत तक्रारी





प्राप्त झाल्यानंतर शिक्षण विभागाने गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत पडताळणी केली. त्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांच्याकडे सादर करण्यात आला होता. काही शिक्षकांनी शाळांमधील अंतर चुकीचे दर्शविले, काहींनी रुजू होण्याची खोटी तारीख टाकली, काहींनी परस्पर विषय बदल केल्याचे दाखविले होते. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी मंगळवारी नऊ शिक्षकांना निलंबित केले. बदल्यांसाठी खोटी माहिती दिल्यास थेट निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाच्या १८ जून २०२४ रोजीच्या आदेशाने दिलेले आहेत. त्याआधारे ही कारवाई करण्यात आली आहे.


नऊ निलंबित शिक्षकांमध्ये वेगवेगळ्या तालुक्यांत कार्यरत शिक्षकांचा समावेश आहे. यात रवींद्र धर्मा जाधव, भाग्यशाली भास्कर जगताप, जयश्री मारोती कस्तुरे, अलमास फातेमा हसन खान, सुरेखा काशिनाथ वाघ, अंजली नारायण महाजन, आऐशा सुलताना खान, निसार फातेमा जुबेर अहमद, कविता सुरेश अंबुसे यांचा समावेश आहे.

# आयशर ट्रकची दुचाकीला धडक, दोन चिमुकले ठार

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

गंगापूर-छत्रपती संभाजीनगर रोडवरील सिद्धार्थ जिनिंगसमोर झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवर असलेल्या दोन चिमुकल्यांचा करुण अंत झाला असून, त्यांच्या वडिलांची प्रकृती गंभीर आहे. अचानक झालेल्या या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विराट प्रदीप जाधव (४) वेदा प्रदीप जाधव (२.५ वर्षे, रा. शेकटा, बिडकीन) अशी मृत बालकांची नावे आहेत.

महालगाव येथून शेकटा, बिडकीन येथील जाधव कुटुंब (एम. एच. १६ ए. झेड. ७७६५) दुचाकीवरून जात असताना समोरून आलेल्या आयशर (एम एच २५ ए जे ७४०२) या वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेत दुचाकीवरील दोन्ही चिमुकले रस्त्याच्या बाजूला फेकल्या गेले आणि जागीच ठार झाले. वडील प्रदीप रमेश जाधव (३५) गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच रुग्णवाहिनी चालक शुभम वाघमारे यांनी तात्काळ तिघांनाही गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलविले. मात्र डॉक्टरांनी दोन्ही चिमुकल्यांना दाखल



करताच मृत घोषित केले. गंभीर जखमी वडिलांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघातानंतर अज्ञात आयशरचालक फरार झाला असून, गंगापूर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# वडिलांचा खून करणाऱ्या दोघा मुलांना जन्मठेप

हिंगोली । प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील पानकनेरगाव येथे कौटुंबिक वादातून वडिलांचा खून करणाऱ्या दोन मुलांना आजीवन कारावास व प्रत्येकी साडेसात हजार रुपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधिश पी. जी. देशमुख यांनी दिला.

सेनगाव तालुक्यातील पानकनेरगाव येथे संजय आबाराव देशमुख यांचा त्यांचा मुलगा निखील देशमुख व गजानन देशमुख यांच्यासोबत कौटुंबिक कारणावरून वाद सुरु होता. यामध्ये त्यांच्यात कुरबुरी होत होत्या. त्यानंतर ४ जून २०२२ रोजी संजय यांना त्यांची मुले निखील व गजानन यांनी वेळुची काठी, लाकडी राफ्टर याने मारहाण करून जीवे मारले. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी, शिवाजी देशमुख यांच्या तक्रारीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून ६ जून २०२२ रोजी सेनगाव पोलिसांनी निखील व गजानन यांच्याविरुध्द खूनाचा गुन्हा दाखल केला. तत्कालीन पोलिस निरीक्षक रणजीत भोईटे, जमादार टी. के. वंजारे, सुभाष चव्हाण, राजेश जाधव यांच्या पथकाने अधिक तपास करून जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश पी. जी. देशमुख यांच्या न्यायालयात सुनावणीसाठी आले होते. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी निखील व गजानन यांना आजीवन कारावास व प्रत्येकी साडेसात हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. प्रकरणात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड. एन. एस. मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक सरकारी वकील ॲड. सविता देशमुख यांनी काम पाहिले. त्यांना सहाय्यक सरकारी वकील ॲड. एस. डी. कुटे यांनी सहकार्य केले. पैरवी अधिकारी म्हणून जमादार पी. ए. मारकड यांनी काम पाहिले.

# अधिक वेगमर्यादेचे उल्लंघन केल्यास इंटरसेप्टर वाहनाव्दारे होणार कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

**अतिवेगाने वाहन चालवून घडणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी वेगमर्यादेचे उल्लंघन करणारे वाहनांवर कारवाईसाठी तसेच रस्ता सुरक्षितता उपक्रमांना बळकटी देण्यासाठी जिल्हा वाहतुक शाखा जालना यांना नवीन अत्याधुनिक इंटरसेप्टर वाहन प्राप्त झाले आहे. यानुसार नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई होणार आहे.**

सदर इंटरसेप्टर वाहनात कॅमेरा, व्हिडीओ रेकॉर्डींग, ब्रेथ ॲनालायझर, टिंट मिटर इत्यादी सुविधा उपलब्ध असून सदर वाहनामुळ वेगमर्यादेचे उल्लंघन करणारे वाहनांचा क्रमांक व वेग यांची अचुक नोंदणी इंटरसेप्टर वाहनावर असलेले धर्तीवरील कॅमेरा व रडामुळे होत असून ई



चलानची कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. नागरीकांना वाहन चालवितांना वेग मर्यादेचे उल्लंघन करु नये तसेच विना सिटबेल्ट, विना हेल्मेट, दारु पिऊन वाहन चालवू नये सर्व वाहतुक नियमांचे पालन करावे अन्यथा वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनधारकांवर मोटार वाहन कायदा अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे. सदर इंटरसेप्टर वाहनाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, पोलीस उप अधीक्षक (गृह) रविंद्र निकाळजे, पो.नि.भूमन्ना रयतुवार पोलीस कल्याण विभाग, पो.नि.श्री एम.एम. मोहोड मोटार परिवहन विभाग, सपोनि चंद्रकांत चातुरे, जिल्हा वाहतुक शाखा, जालना, राहुल चौरे, मोटार परिवहन विभाग सुपरवायझर यांचे हस्ते करण्यात आले आहे.

# जालना – मंठा रस्त्यावरील साईच्छा हॉटेलवर छापा; ४ पुरुष ३ पीडीत महिला ताब्यात

जालना ( प्रतिनिधी)

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास गुप्त मिळालेल्या माहितीवरून जालना ते मंठा रोडवरील रामनगर साखर कारखाना येथिल साईच्छा हॉटेलवर लॉजमधे बाहेरुन महिलांना आणुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करीत असल्याहची माहिती मिळाल्यावरून पोलिसांनी या हॉटेलवर छापा टाकला. यामध्ये ४ पुरुष ३ पीडीत महिला यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर याबाबत मा. पोलीस अधिक्षक यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या सुचनेप्रमाणे स्थागुशाचे पोनि.पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी व स्टाफचे अंमलदार यांनी छापा टाकला असता, साईच्छा हॉटेल येथे आरोपी साईच्छा हॉटेलचे मालक सुधाकर यादव, मॅनेजर इश्वर बबनराव गायकवाड, पंडीत काळु राठोड, अक्षय एकनाथ बुरकुल हे तीन पीडीत महीलांसह





मिळुन आले. याशिवाय रोख ४०,१२० असा मुद्देमाल मिळुण आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांच्या विरुध्द पोलीस ठाणे मौजपुरी येथे महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे प्रभारी अधिकारी अ.मा.वा.प्र. कक्ष पोउपनि गणेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर आर.टी. रेंगे, पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि संजय गवळी, सपोउपनि एम.बी. वाघ (मौजपुरी पो. स्टे), पोहेकॉ कृष्णा देठे पोहेकॉ सतीश गोफणे (मौजपुरी पो. स्टे), महिला अंमलदार संगिता चव्हाण, पुष्पा खरटमल, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केली.

# तुंबलेल्या गटारी आणि नागरिकांच्या अपेक्षा: पाटोदा शहराचे विद्रुपीकरण

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरात तुंबलेल्या गटारींनी अक्षरशः घाणीचे साम्राज्य निर्माण केले आहे. शहरातील अनेक भागांत गटारीचे पाणी रस्त्यावर येत असल्याने चालणेही मुश्कील झाले आहे. ही समस्या नागरिकांच्या जीवनमानावर थेट परिणाम करत आहे आणि अनेक गंभीर आजारांना आमंत्रण देत आहे.

आरोग्य धोक्यात

तुंबलेल्या गटारींमुळे दुर्गंधी, डासांचा आणि किटकांचा प्रादुर्भाव वाढला असून, आरोग्याचे प्रश्न गंभीर बनले आहेत. गैरसोय रस्त्यांवर साचलेले गटारीचे दूषित पाणी, यामुळे नागरिकांना होणारा त्रास आणि शहराचे विद्रुपीकरण होत आहे.

मोकाट जनावरे

गटारीच्या आसपास मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. यावर



तातडीने उपाय योजना करणे अत्यावश्यक आहे!

पाटोदाकरांची नगराध्यक्ष आणि नगर पंचायत उमेदवारां कडून स्पष्ट अपेक्षा

- स्वच्छ भूमिका: गटार तुंबण्याच्या समस्येवर स्पष्ट, ठोस आणि व्यवहार्य कृती आराखडा जाहीर करा.
- नियमित साफ सफाई: शहराच्या सर्व भागात गटार साफसफाईची नियमित योजना लागू करा.
- नवीन ड्रेनेज व्यवस्था: आवश्यक ठिकाणी नवीन आणि आधुनिक भूमिगत गटार योजना तयार करण्याचे आश्वासन द्यावे.

फक्त आश्वासने नकोत; आता ठोस कृती आणि वेळेचे बंधन असलेली योजना हवी आहे. स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण पाटोदा बनवण्यासाठी कोण पुढे येतं, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे!






# वंचित - एमआयएम बिघडवणार विजयाचे गणित

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय राज्य ते स्थानिक पातळीवर जातीच्या आधारावर राजकारण केले जाते आणि निवडणुका जिंकल्या जातात हे सत्य असले तरी आता स्थानिक च्या राजकारणात जातीचे गणित बांधताना अनेक अडचणी निर्माण होताना दिसत आहेत वंचित बहुजन आघाडी आणि एम आय एम सारख्या पक्षात जे गृहीत धरत होते किंवा त्यांच्या फायदा आणि तोटा कोणत्या पक्षाला होणार यावर बांधली जाणारी गणिते आता अवघड होताना दिसत आहेत अनेकांच्या विजयाचे गणित वंचित आणि एमआयएम बिघडवणार असले तरी भाजप सारखा पक्ष मधफुटीवरून इकडे ढोल बडवत असला तरी भाजपलाच हक्काची मते घेताना नाकी नऊ येणार असल्याचे दिसत आहे.

## मतदारांना गृहीत धरणे घातक ठरणार: भाजपालाही धोक्याची घंटा

बीड जिल्ह्यातील बीड सह गेवराई माजलगाव धारूर अंबाजोगाई आणि परळी या सहा नगरपालिकेच्या निवडणुका आहेत आज अधिकृतरित्या चिन्हाचे वाटप झाले आहे आज पासून खऱ्या अर्थाने प्रचाराला सुरुवात झाली असे म्हणता येईल राष्ट्रीयकृत पक्षाने प्रचाराला मागील काही दिवसापासूनच सुरुवात केली असली तरी अपक्षांना मात्र आज पासून प्रचार सुरू केला आहे सर्वच महानगरपालिकेमध्ये निवडणुकीत जाती गणिते पाहिली तर मुस्लिम आणि दलित समाजाच्या मतदारांची संख्या इतरांच्या तुलनेत अधिक आहे त्यामुळे खास करून वंचितला दलित बहुजन तर एम आय एम ला मुस्लिम मतदार स्वीकारतो असा अनेकांचा झालेला भ्रम यावेळी मात्र दूर होण्याची शक्यता नाकारता येत नाही विशेषतः मागील विधानसभा आणि लोकसभा या दोन्ही निवडणुकीमध्ये दलित आणि मुस्लिम महा विकास आघाडीकडे झुकले होते मात्र आता स्थानिक पातळीवर तशी परिस्थिती राहिलेली नाही प्रत्येक उमेदवार आपल्या जातीच्या मतदाराकडे गृहीत धरून चालत आहे मात्र मतदार जातीच्या उमेदवाराला मदत करेल हे सांगणे कठीण आहे कारण त्यांनी आता पर्याय निवडणे सुरू केले आहे परंतु तसे जर झाले तर ज्यांनी विजयाचे आखाडे बांधले होते त्यांचा मात्र हिरमुळ होण्याची शक्यता आहे अनेकांच्या विजयावर पाणी फिरले जाईल कारण संख्येने अधिक असलेले मुस्लिम आणि दलित एकत्र नाहीत शिवाय त्या त्या समाजाचे उमेदवार आहे मग ते कोणाला झुकते माप देणार यावरही जय पराजय अवलंबून आहे मुस्लिम चेहरा पुढे करत राष्ट्रवादी अजित पवार गटाने तर दलित चेहरा पुढे करत राष्ट्रवादी शरद पवार गटाने उमेदवार दिले मुस्लिम चेहरा पुढे करत एम आय एम ने उमेदवार दिले मात्र त्याला समाज कितपत स्वीकारेल हा मोठा प्रश्न आहे अशातच मताची विभागणी होईल आणि विजय आपला होईल या स्वप्नात सध्या भाजप उमेदवार आहे मात्र भाजपांना हक्काची मते घेताना दमछाक होताना दिसत आहे हिंदू बेस पुढे करत भाजपने प्रचार यंत्रणा राबवली असली तरी मूळ ओबीसीच भाजपला कितपत साथ देईल हे सांगता येत नाही हा भ्रमाचा भोपळा कधीही फुटू शकतो अशीच परिस्थिती जिल्हाभर आहे.

### अपक्षांना केवळ पाच दिवस

उमेदवारी अर्ज दाखल करणे त्याची छाननी माघार घेणे या प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आज बुधवारी अधिकृत पक्ष चिन्हाचे वाटप झाले विशेषता नोंदणी करत पक्षाने प्रचार मागेच सुरू केला मात्र अपक्षांना आता कुठे पक्ष चिन्ह मिळाले आहेत त्यामुळे केवळ पाच दिवसच प्रचारासाठी अपक्षांना मिळणार आहे.



## टक्केवारीवर राजकारण करणाऱ्यांना गेवराईच्या विकासाची भाषा शोभत नाही –बाळराजे पवार

गेवराई । प्रतिनिधी

विकासाची भाषा करून,जनतेची दिशाभूल करणारे अमरसिंह पंडित यांनी गेवराई तालुक्यातील विकासाचे एक गाव दाखवावे, तुम्ही केलेली एक चांगली पाणी पुरवठा योजना सुरू असलेली दाखवा, पोपटपंची करून विकासाच्या गप्पा मारता आणि टक्केवारी खाता तुमच्या तोंडात विकासाची भाषा शोभत नाही अशी खरमरीत टिका भाजप नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि. २५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कॉर्नर सभेत भाजप युवा नेते बाळराजे दादा पवार यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यावर आक्रमक आणि कडक शब्दात हल्ला

गेवराई नगरपरिषद चढवला. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गिताभाभी पवार तसेच प्रभाग क्रमांक ८, ९ व १० मधील उमेदवार सोनाली सुभाष सुतार, शहेदाद भाई आणि एजाज भाई सय्यद यांच्या प्रचारार्थ झालेल्या या सभेत ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजीमंत्री बदामरावजी पंडित, उमेदवार सौ.गीताभाभी पवार, रोहीत पंडित, प्रा.पी टी चव्हाण, अमोल करांडे, राजेंद्र राक्षसभुवनकर, सय्यद एजाज, शेख शेहदाद, कैलास माने, ◀◀ पान ३ वर

## माझे नाव घेतल्याशिवाय विरोधकांना भाषण करता येत नाही –अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

मतदारांनी वीस वर्ष यांना नगर परिषदेची सत्ता दिली, या काळात त्यांना शहराच्या विकासाची कामे करता आली नाहीत, स्वत:ची निष्क्रीयता लपविण्यासाठी विरोधक आम्हाला शिव्या-शाप देत आहेत. माझे नाव घेतल्या शिवाय विरोधकांना भाषणे करता येत नाहीत, यांच्या नौंटकीमुळे

गेवराईकरांची करमणूक होत असली तरी सामान्य मतदार



विकासाला मत देईल असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जाहिरनामा प्रकाशनानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. जाहिरनाम्यातील प्रत्येक आश्वासन पुर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

गेवराई राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने नगर परिषद निवडणुकीसाठी जाहिरनामा प्रकाशित केला, यावेळी भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, जेष्ठनेते एस.वाय. अन्सारी, समदभाई आत्तार, शाहीर रामभाऊ मुळे, सुमंतराव मुळे, डी. यु. कांडेकर, मनोहर पिसाळ, दिलीप गंगवाल, ◀◀ पान ३ वर

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणे हा गुन्हा आहे का?

### गोपाळ पैंजणे यांच्यावर ऐन निवडणुकीत गुन्हा दाखल, दडपशाही विरोधात संताप

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य दर मिळावा, त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवावा म्हणून आंदोलन करणं हा गुन्हा ठरतो का, असा संतप्त सवाल शेतकरी व कार्यकर्त्यांकडून उपस्थित होत आहे. ऊस दरवाढ आंदोलनाच्या संदर्भात नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. सोनाली गोपाळ पैंजणे यांच्या प्रचाराला आळा घालण्यासाठी त्यांचे पती गोपाळ पैंजणे यांच्यावर ऐन निवडणुकीच्या तोंडावर गुन्हा दाखल करून



अटक करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

स्थानिक कारखानदार आणि प्रस्थापित नेत्यांच्या सांगण्यावरून दडपशाहीचा हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप ग्रामीण पातळीवर जोरदार होत आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी आवाज उठवणाऱ्यांवर कारवाई ◀◀ पान ३ वर

## माजलगावमधील माकप उमेदवाराची पक्षातून हकालपट्टी

माजलगाव । प्रतिनिधी

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रभाग क्रमांक आठ मधील उमेदवार रुपेश चव्हाण यांनी पक्षविरोधी भूमिका घेऊन महायुतीच्या उमेदवाराला वैयक्तिक पाठिंबा दिल्यामुळे त्यांची तात्काळ पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेली आहे.

पक्षाच्या जिल्हा सचिव मंडळाने पक्षातून हकालपट्टीच्या निर्णयाचा ठराव घेताना म्हटले आहे की , माजलगाव नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक आठ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने रुपेश चव्हाण यांना अधिकृत उमेदवारी दिलेली होती. मात्र त्यांनी पक्षाबरोबर गद्दारी करून महायुतीतील उमेदवाराला वैयक्तिक स्वरूपाचा पाठिंबा देऊन पक्षविरोधी भूमिका घेतलेली आहे. त्या भूमिकेशी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही ती सदरील उमेदवाराची वैयक्तिक स्वरूपाची भूमिका आहे. म्हणून पक्षाच्या जिल्हा सचिव मंडळाने घेतलेल्या निर्णयाला माजलगाव तालुका कमिटीनेही पाठिंबा देऊन रुपेश चव्हाण यांची माजलगावच्या शहर शाखेमधून हकालपट्टी करण्याचा निर्णय माजलगाव पक्ष तालुका कमिटीच्या वतीने तालुका सचिव शिवाजी कुरे यांनी घेतलेला आहे.

## वडवणी पंचायत समिती घरकुल योजनेत जिल्ह्यात प्रथम

वडवणी । प्रतिनिधी

रमाई आवास घरकुल योजना व प्रधानमंत्री आवास घरकुल योजना अंतर्गत विशिष्ट प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांना पक्के घर बांधून दिले जाते बीड जिल्ह्यात वडवणी पंचायत समितीने घरकुल योजनेत सर्वाधिक लाभ लाभार्थ्यांना मिळवून देऊन वडवणी पंचायत समितीचा घरकुल योजनेत बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या उल्लेखनीय कामगिरी मागे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी केलेले नियोजन व सातत्यपूर्ण केलेल्या



पाठपुराव्यामुळे घरकुल योजनांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना लाभ मिळवून दिला.

या यशाबद्दल लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा तिगाव ग्रामपंचायतचे सरपंच ड.राज पाटील यांनी वडवणी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांचा शाल,संवाद पुस्तक भेट देऊन व सत्कार ◀◀ पान ३ वर

## पाटोदा तहसीलदार निलावाड यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करावी –अनिता वानखेडे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तहसिलला सध्या कार्यरत असलेले तहसीलदार दत्तात्रय (दत्ता) बळीराम निलावाड यांच्या विरुद्ध कठोर व तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी तक्रार निवेदनाद्वारे जितेंद्र पापळकर साहेब, विभागीय अधिकारी कार्यालय,जि.छत्रपती संभाजीनगर यांच्या कडे सौ.अनिता नितीन वानखेडे यांनी लेखी तक्रार केली आहे.

जात पडताळणी समितीने जावक क्रमांक १५१८९/२०२५



दिनांक ७/११/२०२५ मा.अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र समिती,किनवट छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश अशा प्रकारे संदर्भ दिला असून तहसीलदार दत्ता बळीराम निलावाड यांचे मन्नेरवारलू - अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र तसेच जातवैधता प्रमाणपत्र अवैध घोषित करून दोन्ही प्रमाणपत्रे रद्दबातल केली आहेत.

तसेच सुप्रीम कोर्ट - FCI VS. जगदीश बहिरा (२०१७) निर्णयानुसार बनावट/अवैध जात प्रमाणपत्राच्या आधारावर घेतलेली सेवा व लाभ तत्काळ रद्द करणे बंधनकारक आहे. सर्व असूनही संबंधित अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली ◀◀ पान ३ वर

## चोभा निमगाव परिसरातील पुरात वाहून गेलेले विजेचे पोल दोन महिने झाले तरी नादुरुस्तच

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे व पुरामुळे अतोनात नुकसान झाले आहे.यात अनेक ठिकाणी विजेचे खांब पुरामुळे वाहून गेल्याने वीज पुरवठा बंद आहे.आता दोन महिने झाले तरीही चोभा निमगाव परिसरातील विजेच्या तारा व खांबांची दुरुस्ती न झाल्यामुळे शेतकरी वर्गावर महावितरणने पुन्हा नवे संकट उभे केले आहे.

सप्टेंबर २०२५ महिन्यात कांबळी नदीला दोन वेळा आलेल्या




महापुरामुळे नांदा आणि निमगाव चोभा परिसरातील नदीकाठची सर्व पिके वाहून गेली. सोबत विजेचे खांबही वाहून गेले. या परिसरात जोशी मळा (निमगाव चोभा) हद्दीतील डीपीवरून छगन बनसोडे (नांदा) यांच्या विहिरीपर्यंतचे ८ खांब आणि तारा वाहून गेल्या.या परिसरात ७ विहिरी असून, जवळजवळ ५० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. खरीप पीक वाहून गेले असून, उरलेल्या पिकाला पाणी देता येत नाही. त्यामुळे रब्बीची पेरणीही थांबली आहे. परिसरातील शेतकरी वारंवार कडा, आष्टी येथील महावितरण कार्यालयात पाठपुरावा करत आहेत, परंतु त्याची दखल घेतली जात नाही.येत्या चार दिवसात विजेची समस्या न सोडल्यास शेतकरी महावितरण कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेने २५ लाखांचा गुटखा पकडला

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत त्यांच्या सूचनेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशावरून अंबाजोगाई हद्दीत अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस हवालदार केकान, गीते, भताने, आंधळे यांची रवानगी करण्यात आली. या परिसरात पेट्रोलिंग करत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्यावर अंबाजोगाई कडे गुटख्याने भरलेली पांढऱ्या रंगाची इनोव्हा क्रिस्टा कार येणार असल्याची माहिती मिळाली. यावरून शेलुआंबा रोडवर टोल नाक्यावर दोन पंचासह जाऊन ही गाडी पकडली. टोल नाक्यावर ईनोव्हा क्रिस्टा क्रमांक एम. एच. १४ जी. यु. ०६९९ ही बर्दापूर कडून आल्याचे दिसले. ही गाडी थांबून या गाडीतून



५,२६,२०० रुपयांचा गुटखा आणि सदर गाडी असा २५ लाख २६ हजार २०० रुपयांचा माल जप्त केला. दिनांक २६ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता ही गाडी टोल नाक्यावर आल्यानंतर गाडी थांबून चालकाचे नाव विचारले असता त्याने फारोख हमीद सय्यद (वय ४५) राहणार सय्यद गल्ली माजलगाव असे सांगितले. त्याच्या ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता वाहनांमध्ये विविध कंपनीचा आणि महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला पाच लाख सव्वीस हजार दोनशे रुपयांचा गुटखा ताब्यात घेतला. व क्रिस्टा कार असा एकूण २५ लाख २६ हजार दोनशे रुपयांचा मुद्देमात जप्त करून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनला रवाना करून या इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशावरून केकान, गीते, भताने, आंधळे आदींनी केली.

## गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या इसमास अटक

बीड । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक पार्श्वभूमीवर तपासणी चालू असतांना अवैध पिस्तूल बाळगणाऱ्या इसमाची गोपनीय माहिती काढून सौताडा येथील विशाल मरकस मस्के याला पोलिसांनी ताब्यात घेतले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू असतांना दिनांक २५ नोव्हेंबर रोजी



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की विशाल मस्के हा सौताडा येथील एका हॉटेलवर कमरेला पिस्तूल लावून कोणाची तरी वाट पाहत आहे. याची माहिती मिळताच पथकाने तात्काळ या ठिकाणी जाऊन सापळा रचून विशाल मस्के याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्यांच्या पँटच्या आत मध्ये कमरेला गावठी पिस्तूल लावलेले सापडले. हे पिस्तूल जप्त करण्यात आले. तसेच मस्के यांच्या विरुद्ध पाटोदा पोलीस ठाण्यात कलम ३/ २५ आर्म अक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पोलीस हवालदार बाळू सानप, अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड ,आनंद मस्के, विकी सुरवसे, चालक पोलिस अंमलदार सिद्धेश्वर मांजरे आदींनी केली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरुवार दि.२७ नोव्हेंबर २०२५ । पान ७

# पुणेकरांना मोदी सरकारंच मोठं गिफ्ट !

## मेट्रोसाठी कोट्यावधी रुपयांच्या निधीला मंजूरी

**पुणे । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील लाइन ४ (खराडी–हडपसर–स्वारगेट–खडकवासला) आणि लाइन ४–अ (नळ स्टॉप–वारजे–माणिक बाग) यांना मंजुरी देण्यात आली. लाइन २अ (वनाज–चांदणी चौक) आणि लाइन २ब (रामवाडी–वाघोली/विठ्ठलवाडी) यांच्या मंजुरीनंतर फेज २ अंतर्गत मंजूर झालेला हा दुसरा मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने ९८५७.८५ कोटींच्या निधीला देखील मंजूरी देली आहे.

४ व ४–अ या दोन्ही लाइन्सचे एकूण ३१.६३ किमीचे अंतर असून यामध्ये २८ एलिव्हेटेड स्टेशन्सचा समावेश असणार आहे. यामुळे पूर्व, दक्षिण व पश्चिम पुण्यातील आयटी हब, व्यावसायिक क्षेत्रे, शैक्षणिक संस्था व निवासी क्लस्टर्स जोडण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी पाच वर्षांची मुदत असून या प्रकल्पाचा निधी केंद्र, राज्य व निधी संस्थांकडून वितरित होणार आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन



लिमिटेड (महा–मेट्रो) द्वारे राबविला जाणार आहे. महामेट्रो सर्व नागरी, विद्युत, यांत्रिक आणि प्रणाली–संबंधित कामे करेल. स्थलाकृतिक सर्वेक्षण आणि तपशीलवार डिझाइन सल्लामसलत यासारख्या बांधकामपूर्व प्रक्रिया आधीच सुरू करण्यात आल्या आहेत. या ताज्या मंजुरीमुळे, पुणे मेट्रोचे जाळे १०० किलोमीटरपेक्षा जास्त होईल, जे शहराच्या आधुनिक, एकात्मिक आणि शाश्वत शहरी वाहतूक व्यवस्थेच्या प्रवासात एक महत्त्वाचे पाऊल आहे. मंजूरी देण्यात आलेल्या दोन्ही लाइन्स या खराडी आयटीपार्कपासून खडकवासला या पर्यटनस्थळापर्यंत तर हडपसरच्या औद्योगिक केंद्रापासून वारजेच्या निवासी क्लस्टरपर्यंत जोडण्यात येणार आहेत. सोलापूर रस्ता, मगरपट्टा रस्ता, सिंहगड रस्ता, कर्वे रस्ता व मुंबई–बंगळुरू महामार्गावरुन जाणारी मेट्रो पुण्यातील वर्दळीच्या मार्गांवरील गर्दी कमी करणार आहे.

हा विस्तार खराडी बायपास, लाइन २ वरील नळ स्टॉप आणि लाइन १ वरील स्वारगेट येथे इंटरचेंज पॉइंट्ससह विद्यमान आणि मंजूर कॉरिडॉर जोडण्यासाठी डिझाइन केला आहे. तो हडपसर रेल्वे स्टेशनला देखील जोडेल, ज्यामुळे मेट्रो आणि रेल्वे दरम्यान बहुआयामी कनेक्टिव्हिटी निर्माण होईल.

अपेक्षित प्रवासी संख्या

अंदाजानूसार दोन्ही मार्गिकांवरील प्रवासीसंख्या ही २०२८ मध्ये ४ लाखांच्या आसपास असू शकेल. हीच प्रवासी संख्या २०३८ मध्ये ७, २०४८ मध्ये ९.६३ तर २०५८ मध्ये ११.७ लाखांपर्यंत पोहचू शकेल असा अंदाज आहे. यापैकी, खराडी–खडकवासला कॉरिडॉरवर २०२८ मध्ये ३.२३ लाख प्रवासी असतील, जे २०५८ पर्यंत ९.३३ लाखांपर्यंत वाढतील, तर नल स्टॉप–वारजे–माणिक बाग स्पर लाईनवर याच कालावधीत प्रवासी संख्या ८५,५५५ वरून २.४१ लाखांपर्यंत वाढेल. हे अंदाज येत्या काही दशकांमध्ये लाईन ४ आणि ४ अ वरील प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ दर्शवतात.

## भाजप उमेदवारांना निवडून द्या, तुमचा 'तो' प्रश्न मार्गी लावतो; बावनकुळेचं फोनवरुन लोणावळ्यात आश्वासन

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांना आमिष दाखवत नेतेमंडळींकडून मतदान देण्याचं, आमच्याच उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन केलं जात आहे. यंदाच्या निवडणुकीत लाडकी बहीण योजनेची पुन्हा एकदा चलती पाहायला मिळत असून लाडक्या बहिणींना योजना बंद होईल, असे म्हणतही काहींनी अप्रचार सुरू केला आहे. तर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तर मी अर्थमंत्री आहे, तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे आहे. तुम्ही मत द्या मी निधी देतो असे म्हणत मतदारांना भुरळ घातल्याचं दिसून आलं. आता, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही लोणावळातील कार्यकर्त्यांना, मतदारांना प्रश्न सोडविण्याचं आमिष दाखवलं आहे.

नगरपालिका निवडणुकांच्या प्रचारात राज्यातील मंत्री आणि अनेक दिग्गज नेत्यांकडून वेगवेगळी प्रलोभनं दाखवली जात आहेत. काहीजण तर अप्रत्यक्षपणे धमकीही देत आहेत. त्यातचं आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची भर पडल्याचं दिसून



आलं. लोणावळ्यातील प्रलंबित प्रॉपर्टी कार्ड आणि सिटी सर्व्हेचा प्रश्न सोडवण्यासाठी मी २ डिसेंबरनंतर म्हणजे मतदानानंतरच्या मंगळवारी बैठक घेतो अन् तुमचा प्रश्न तीन महिन्यात निकाली लावतो. मात्र, त्यासाठी भाजपा उमेदवारांना निवडून द्या, असेही त्यांनी म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी महसूलमंत्री म्हणून मला अधिकार दिला आहे. फक्त तुम्ही लोणावळ्यात भाजपचे उमेदवार निवडून द्या. मग मी माझ्या अधिकाराचा वापर करुन तुम्हाला प्रॉपर्टी कार्ड आणि सिटी सर्व्हे करुन देईन, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं. भाजप नेते तथा आमदार प्रवीण दरेकर आज लोणावळा नगरपरिषदेच्या प्रचारासाठी येथे आले होते.त्यावेळी लोणावळ्यातील प्रॉपर्टी कार्ड आणि सिटी सर्व्हेचा प्रश्न सोडवण्याच्या अनुषंगाने स्थानिक नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी प्रवीण दरेकरांपुढे प्रश्न मांडला. त्यानंतर, दरेकरांनी थेट महसूलमंत्री बावनकुळे यांना फोन लावला. तसेच, तो फोन लाऊडस्पीकरवर ठेवून कार्यकर्त्यांसाठी संवाद साधला. त्यावेळी, बावनकुळे यांनी लोणावळ्याच्या जनतेला प्रलोभन दिल्याचं दिसून आलं. आता, महसूलमंत्री आणि दरेकर यांच्यातील संवादाचा हा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे. दरम्यान, शिवसेना नेते तथा मंत्री गुलाबराव पाटील यांनी निवडणूक प्रचारात लक्ष्मीदर्शन होईल, असे म्हटल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. ३० तारखेला प्रचार संपणार आहे, त्यानंतर लक्ष्मीदर्शन होईल, असे त्यांनी म्हटले.

## जेजुरीची हद्दवाढ करण्यासाठी प्रयत्नशील : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार जयदीप बारभाई याचे प्रतिपादन

**पुणे । प्रतिनिधी**

जेजुरी नगरपरिषदेची ५ किलोमीटरपर्यंत हद्दवाढ करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू ,असे प्रतिपादन नगराध्यपदाचे उमेदवार जयदीप बारभाई यांनी केले. जेजुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जेजुरी शहरातील विविध प्रभागातील मतदारांच्या भेटीगाठी दरम्यान जयदीप बारभाई यानी वरील प्रतिपादन केले.

जयदीप बारभाई पुढे म्हणाले की, जेजुरी शहरातील नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषदेचे वार्षिक बजेट आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि जेजुरी शहरालगत असलेल्या



दोरगेवाडी,कुंभारकरवस्ती दवणेमळा स्टेशन परिसर, माऊलीनगर, कोळेकर वस्ती, जेजुरी एमआयडीसी परिसर इत्यादी ठिकाणीच्या नागरिकांना नगरपालिकेकडे किंवा कोणत्याही ग्रामपंचायतीकडे ना घराची नोंदणी ना सात बारा उतारा यावर नोंद नसल्याने बँक कर्ज योजना घरकूल योजना, रस्ते गटार पाणीपुरवठा योजना त्याबरोबर इतर योजना मिळत नाही. त्यामुळे तरुण पिढी ही नैराश्यमय जीवन जगताना पहावयास मिळते. नगरपरिषदेच्या माध्यमातून सोयीसुविधा उपलब्ध करून देताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जेजुरी नगरपरिषदेची हद्दवाढ करणे आवश्यक आहे. या भागातील नागरिक मतदार असूनही भौतिक सुविधांची वानवा आहे. हा भाग नगरपरिषद हद्दीत नाही. त्याबरोबर नगरपरिषदेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी मदत होईल.जेजुरीचा घन प्रकल्प हा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून त्यासाठी एमआयडीसी परिसरात जागा उपलब्ध करून त्यावर बायोमायनिंग प्रकल्प राबविण्यात येईल आणि त्या माध्यमातून नगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी मदत होईल.असे आश्वासन नगराध्यपदाचे उमेदवार जयदीप बारभाई यांनी सांगितले. जेजुरी नगरपरिषदेचे वार्षिक अंदाजपत्रकात १५०कोटींची वाढ करण्याचा प्रयत्न करणार.

## विकासकामांना निधी कमी पडू देणार नाही:आमदार योगेश टिळेकर

**जेजुरी । प्रतिनिधी**

भाजप विचारांचा नगराध्यक्ष निवडून दिल्यास शहरातील विकासकामांसाठी कोणताही निधी अपुरा पडू देणार नाही, अशी ग्वाही माजी आमदार योगेश टिळेकर यांनी दिली. जेजुरीतील विविध विभागांतील भाजप समर्थित उमेदवारांच्या प्रचार सभेत ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून जेजुरी शहरात आवश्यक असलेल्या पाणी, वीज, रस्ते आदी सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देता येईल. राज्य शासनाची लाडकी बहीण योजना सर्व समाजातील महिलांना कोणताही जात–धर्म न पाहता देण्यात येत असून, ही योजना सामान्य बहिणींसाठी आशेचा किरण ठरत आहे. गेल्या आठ वर्षांपासून खंडोबा मंदिरात बंद असलेली पाद्यपूजा निवडणुकीनंतर पुन्हा सुरू



करण्याचे आश्वासन दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या माध्यमातून ही परंपरा पुनर्स्थापित केली जाईल आणि त्यामुळे सर्व समाजातील भक्तांना या धार्मिक विधीचा लाभ घेता येईल. जेजुरीच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक ओळखीला नवी ऊर्जा मिळावी यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे.

प्रचारसभेत नगराध्यक्ष पदासाठी उभे असलेले उमेदवार – सचिन सोनवणे, सोनाली चौंडकर, नरेंद्र पवार, ॲड. दीप्ती जोशी, ईश्वर दरेकर, विना सोनवणे, सागर हरपळे, अनिकेत भालेराव, रोहिणी बारसुडे, वर्षा कोशे, सदानंद बारबाई, जयदीप भापकर, प्रज्ञा कांबळे, कुमार गावडे, गणेश डोंबे, प्रियंका देशमुख, काजल दोडके आणि गणेश शिंदे – यांच्या समर्थनार्थ मोठ्या उत्साहात पदयात्रा व सभा पार पडली.

कार्यक्रमाला माजी आमदार अशोक टेकवडे, भाजप नेते बाबाराजे जाधवराव, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाराम जगदाळे, जेजुरी शहराध्यक्ष सचिन पेशवे, तसेच सचिन लंबाते, गणेश भोसले यांसह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. जेजुरी नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत विविध राजकीय घडामोडींमुळे वातावरण तापू लागले असून, भाजप नेत्यांच्या आश्वासनांमुळे प्रचाराला वेग आला आहे.

विमानतळामुळे संधी

माजी आमदार संजय जगताप यांनीही जेजुरीच्या विकासाबाबत मनोगत व्यक्त केले. पुरंदर तालुक्यात उभारला जाणारा नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ हा संपूर्ण परिसराच्या वाढीसाठी संधी असल्याचे सांगत, जेजुरीचा नवीन डीपीआर तयार करून शहराची हद्द वाढवणे अत्यावश्यक आहे, असे ते म्हणाले. विमानतळामुळे वाढणार्या लोकसंख्या व उद्योगांच्या पार्श्वभूमीवर जेजुरीत पायाभूत सुविधा आणखी बळकट करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

## रिलायंसच्या पुणे व मुंबई कार्यालयातील जंगम मालमत्ता जप्त करा; न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**पुणे । प्रतिनिधी**

मोटार अपघात न्यायप्राधिकरणाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करता नुकसान भरपाई न देणे रिलायन्स जनरल इन्शुअरन्स कंपनीला महागात पडले आहे. पुणे व मुंबई येथील कार्यालयातील जंगम मालमत्ता जप्तीचे आदेश मोटार अपघात न्यायप्राधिकरणाचे सदस्य सत्र न्यायाधीश बी.डी.कुलकर्णी यांनी दिले आहेत. या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ड. मजहर मुजावर आणि ड. प्रमोद धुळे यांनी काम पाहिले.

अर्जदार सिद्रा युसुफ शेख यांनी पतीचा अपघाती मृत्यू झाल्याने येथील मोटार अपघात न्यायप्राधिकरण येथे ड. मजहर मुजावर आणि ड. प्रमोद धुळे यांच्यामार्फत दावा दाखल केला



होता. हा दावा रिलायन्स जनरल इन्शुअरन्स कंपनीच्या विरोधात होता. यात सुनावणी करत २६ लाख १५ हजार ५०० रुपये नुकसान भरपाई वार्षिक ७.५ टक्के व्याजाने देण्याचा आदेश मोटार अपघात न्यायप्राधिकरणाने १७ मार्च २०२५ रोजी दिला आहे.

व्याजासह ही रक्कम ३० लाख ७२ हजार २४७ होत आहे. मात्र, विमा कंपनीतर्फे या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. तसेच, वरच्या न्यायालयात अपीलही करण्यात आले नाही. त्यामुळे अर्जदारानी निकालाच्या अमलबजावणीसाठी दर्खास्त दाखल केले. यामध्ये विमा कंपनी हजर झाली. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने वरील आदेश दिला.

## पुण्यातील महिलेचा तरुणावर अत्याचार; कोथरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

येथील एका तरुणीने चंदगड येथील तरुणाला आपल्या जाळ्यात ओढून काशी येथे नेले. तेथे त्याच्यावर शारीरिक अत्याचाराचा प्रयत्न केला. याशिवाय २ लाख रुपयांची खंडणी मागितली. पैसे दिले नाही, तर फोटो व्हायरल करेन, अशी धमकी दिल्याबाबत चंदगड येथील एका ४७ वर्षांच्या व्यक्तीने कोथरूड पोलिसांत फिर्याद दिली आहे.

यावरून पोलिसांनी कोथरूड येथील ४२ वर्षांच्या महिलेवर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार ३ मार्च ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान घडला आहे. फिर्यादीचे कुटुंब गेल्या वर्षी ७ नोव्हेंबर २०२४ रोजी तुळजापूर येथे दर्शनासाठी गेले असता



पुण्यातील या महिलेची ओळख झाली. त्यातून महिलेने फिर्यादीच्या घरी जाणे सुरू केले. फिर्यादीच्या पत्नीला तिने मी फिर्यादीस भाऊ मानत असल्याचा दिखावा केला. त्यानंतर फिर्यादीच्या पत्नीला कॉल करून पुण्यातून माझी मैत्रीण स्वाती व तिचे कुटुंब आम्ही काशीला जाणार आहोत. तुझ्या पतीलाही पाठवून दे, असे सांगितले. काशी येथे नेऊन अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक करिश्मा शेख तपास करीत आहे.

## पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने २६ ११ हल्ल्यातील जवानांना अभिवादन



**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)च्या वतीने बुधवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधान दिनाच्या ७५ व्या अमृत महोत्सानिमित्ताने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी येथे पुष्पहार अर्पण करून तसेच २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहून सामूहिक संविधान प्रस्तावना वाचन व अभिवादन शहराध्यक्ष, मा.महापौर योगेश बहल यांच्या मार्गदर्शनाने मध्यवर्ती पक्ष कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे सकाळी १०:०० वाजता करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, मा.नगरसेवक ड. गोरक्ष लोखंडे, कार्याध्यक्ष विजय लोखंडे, मा.जितेंद्र ननावरे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय औसरमल, सामाजिक न्याय महिला अध्यक्षा गंगा धेंडे, प्रदेश सरचिटणीस शोभा पगारे, कामगार सेल अध्यक्ष युवराज पवार, चिंचवड विधानसभा महिला अध्यक्षा संगिता कोकणे, मिरा कदम, वैद्यकिय सेल अध्यक्षा मेगाली विटकर, ड. राकेश गुरव, अकबर मुल्ला,रमजान सय्यद,बाळासाहेब पिल्लेवार, धनाजी तांबे इत्यादी पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## भारतीय संविधानाने दिला प्रत्येक भारतीयाला सन्मानाने जगण्याचा अधिकार-अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर

**पिंपरी । प्रतिनिधी**

भारतीय संविधानामळे आपल्या देशातील नागरिकांना न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांची हमी देणारा अमूल्य ठेवा दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवलेले संविधान प्रत्येक भारतीयाला सन्मानाने जगण्याचा अधिकार तर देतेच, त्याचबरोबर अधिकार व कर्तव्यांची जाणीवही करून देते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनही याच संविधानिक मूल्यांनुसार पारदर्शक, जबाबदार आणि लोकाभिमुख कामकाज करण्यास कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.

भारतीय संविधान दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता विनय ओहोळ,अभिमान भोसले, विशेष अधिकारी किरण गायकवाड,कॉम्पुटर ऑपरेटर सुरेश तनपुरे



यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करून राष्ट्रीय एकात्मता जपण्याचा निर्धार केला. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी भारतीय संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले.

तसेच पिंपरी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भिमसृष्टी) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांनी संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन केले. यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब रोकडे, बापूसाहेब गायकवाड, संतोष जोगदंड,धम्मराज साळवे, संजय बनसोडे, प्रकाश बुक्तर, सुरेश रोकडे, गिरीश वाघमारे, दत्ता खानबीर, राजन नायर, रफिक कुरेशी, दीपक म्हेत्रे, नितीन गवळी, कांचन वाघमारे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## भोरमधील 'नाटंबी' देवराई धोक्यात! महादेवाच्या टेकडीवर बेकायदा वृक्षतोड; ग्रामस्थांची वनविभागाकडे धाव

**पुणे । प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील नाटंबी येथील नीरा नदीच्या काठावर असलेल्या महादेवाच्या मंदिराच्या टेकडीवरील देवराई वनखात्याची कोणतीही परवानगी न घेता तोडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. साईबेज कंपनी आणि काही व्यक्तींनी संगनमत करून ही छोटी–मोठी झाडे तोडली असून, यामुळे संपूर्ण देवराई धोक्यात आली आहे.

या गंभीर घटनेनंतर नाटंबी येथील ग्रामस्थांनी तातडीने वनखात्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्यांवर वनविभाग कायदेशीर कारवाई करणार की नाही, याकडे संपूर्ण नाटंबी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. या वृक्षतोडीच्या घटनेत ट्रस्टचे अध्यक्ष देखील सामील असल्याचा अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. नाटंबी येथील गट क्रमांक ४९५ या



जागेमध्ये शंभू महादेवाचे मंदिर आहे. ही जागा श्री पद्मावती देवी देवस्थान ट्रस्ट, नाटंबी या विश्वस्त संस्थेच्या नावावर आहे. याच गटातील वनझाडे आणि दुर्मिळ वृक्षांची मागील चार दिवसांपासून खूप मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. संपूर्ण नाटंबी ग्रामस्थांनी एकत्र येत वनविभागाकडे लेखी स्वरूपात मागणी केली आहे की, या जागेची तातडीने वनविभाग मार्फत पाहणी करण्यात यावी आणि दोषींवर कारवाई करावी. तक्रार दाखल करताना शिवाजी बाबुराव खोपडे, प्रमोद दिनकर खोपडे, पंढरीनाथ लक्ष्मण खोपडे, संदीप धर्म खोपडे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.